भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# वक्फ अधिनियम, १९५४

## (१९५४ चा अधिनियम क्रमांक २९)

[१ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Wakf Act, 1954

## (Act No. 29 of 1954)

**[As in force on 1st October, 1977]**

(महाराष्ट्र विशोधन अधिनियमासहित)

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९७९)

[किमत १ रुपया]

# वक्फ अधिनियम, १९५४

## कलमांचा क्रम

कलमे


### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. अधिनियमाची प्रयुक्ती.
३. व्याख्या.

### प्रकरण २ रे

#### वक्फांचे सर्वेक्षण

४. वक्फांचे प्राथमिक सर्वेक्षण.
५. वक्फांच्या सूचीचे प्रकाशन.
६. वक्फांसंबंधीचे तंटे.
७. सर्वेक्षणाच्या खर्चाची वसुली.
८. प्रकरण २ रे विवक्षित राज्यांना लागू नाही.

### प्रकरण २ रे-क

#### केंद्रीय वक्फ परिषद

८क. केंद्रीय वक्फ परिषदेची स्थापना आणि घटना.
८ख. परिषदेची वित्तव्यवस्था.
८ग. हिशेब आणि लेखापरीक्षा.
८घ. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

### प्रकरण ३ रे

#### मंडळांची स्थापना आणि त्यांची कार्ये

९. निगमन.
१०. मंडळाची रचना.
११. सदस्यांची नियुक्ती.
१२. पदावधि.
१३. मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्त होण्याच्या किंवा ते सदस्यत्व चालू राहण्याच्या प्रयोजनार्थ निरर्हता.
१४. मंडळाच्या सभा.
१५. मंडळाची कार्ये.
१६. मंडळाच्या समित्या.
१७. अध्यक्षाचा आणि सदस्यांचा राजीनामा.
१८. अध्यक्षाला आणि सदस्यांना काढून टाकणे.
१९. रिक्त पदे भरणे.
२०. सदस्यकुलामधील रिक्त पदे किंवा घटनेतील दोष यांमुळे मंडळाच्या कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.
२१. मंडळाचे सचिव आणि अन्य अधिकारी.
२२. प्रत्यायोजन.
२३. अभिलेखाची तपासणी करणे आणि त्याच्या नकला देणे.
२४. संसदेच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हतेस प्रतिबंध.

## कलमांचा क्रम—चालू

कलमे

### प्रकरण ४ थे

### वक्फांची नोंदणी


२५. नोंदणी.

२६. वक्फ नोंदवही.

२७. एखादी संपत्ती वक्फ-संपत्ती आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय.

२८. वक्फाची नोंदणी करवून घेण्याची आणि नोंदवहीत विशोधन करण्याची शक्ती.

२९. नोंदलेल्या वक्फांतील बदलासंबंधीची सूचना.

३०. व्यावृत्ती.


### प्रकरण ५ वे

### मुतवल्ली आणि वक्फाचे हिशेब


३१. अर्थसंकल्प.

३२. वक्फांचे हिशेब सादर करणे.

३३. वक्फांची लेखापरीक्षा.

३४. मंडळाने लेखापरीक्षकाच्या अहवालावर आदेश काढावयाचे.

३५. देय म्हणून प्रमाणित केलेल्या रकमा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करावयाच्या.

३६. मुतवल्लींची कर्तव्ये.

३६क. वक्फांच्या स्थावर संपत्तीचे हस्तांतरण.

३६ख. कलम ३६क चे व्यतिक्रमण करून हस्तांतरित केलेली वक्फ-संपत्ती परत मिळवणे.

३७. वक्फ-संपत्तीच्या उत्पन्नातून विवक्षित खर्च देण्यास मुतवल्ली हक्कदार.

३८. मुतवल्लीने देणे रकमा देण्यात कसूर केल्यास त्या चुकत्या करण्याची मंडळाची शक्ती.

३९. राखीव निधी निर्माण करणे.

४०. मुदतवाढ.

४१. दंड.

४२. विवक्षित प्रकरणीं मुतवल्लींची नियुक्ती करण्याची शक्ती.

४३. मुतवल्लींना काढून टाकणे.

४३क. मंडळाने विवक्षित वक्फांचे प्रत्यक्ष व्यवस्थापन हाती घ्यावयाचे.

४४. चौकशीसाठी अर्ज.

४५. मंडळाकडून चौकशी.


### प्रकरण ६ वे

### मंडळाची वित्तव्यवस्था


४६. मंडळाला प्रदेय असणारी वार्षिक अंशदाने.

४७. मंडळाची कर्ज काढण्याची शक्ती.

४८. वक्फ निधि.

४९. मंडळाचा अर्थसंकल्प.

५०. मंडळाचे हिशेब.

५१. मंडळाच्या हिशेबांची लेखापरीक्षा.

५२. लेखापरीक्षकाच्या अहवालावरून राज्य शासनाने आदेश काढावयाचा.

५३. येणे म्हणून प्रमाणित केलेल्या रकमा जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य.

५४. [निरसित.]

## कलमांचा क्रम—चालू

कलमे

### प्रकरण ७ वे

#### न्यायिक कार्यवाही

५५. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' याच्या कलम ९२ खाली दावा मांडणे.

५६. मंडळाविरुद्ध असलेल्या पक्षांकडून दाव्यांची नोटीस.

५७. न्यायालयांकडून दावे इत्यादींची नोटीस.

५८. 'भूमिसंपादन अधिनियम, १८९४' खालील कार्यवाही.

५९. मंडळाने अर्ज केल्यावर त्याला वक्फाच्या संबंधातील दाव्यात किंवा कार्यवाहीत पक्षकार करावयाचे.

६०. मुतवल्लींनी किंवा मुतवल्लींविरुद्ध केलेल्या दाव्याबाबत तडजोडीस आडकाठी.

६१. मुतवल्लीने आपली कर्तव्ये पार पाडली नसतील तर, त्याबाबतीत न्यायालयाकडे अर्ज करण्याची शक्ती.

### प्रकरण ८ वे

#### संकीर्ण

६२. केंद्र शासनाकडून निदेश.

६३. राज्य शासनाकडून निदेश.

६४. मंडळ निष्प्रभावी करण्याची शक्ती.

६५. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

६६. आयुक्त, लेखापरीक्षक इत्यादींना लोकसेवक मानावयाचे.

६६क. विवक्षित मंडळांच्या पुनर्रचनेसाठी विशेष उपबंध.

६६ख. राज्याच्या एका भागासाठी मंडळ स्थापन करण्याबाबत विशेष उपबंध.

६६ग. इस्लाम धर्म प्रतिज्ञापित न करणाऱ्या व्यक्तींनी विवक्षित वक्फांच्या परिपोषणासाठी दिलेल्या किंवा देणगी म्हणून दिलेल्या संपत्तीला अधिनियम लागू करणे.

६७. नियम करण्याची शक्ती.

६८. विनियम करण्याची शक्ती.

६९. निरसन आणि व्यावृत्ती.

७०. अडचणीचे निवारण.

अनुसूची.

परिशिष्ट—वक्फ अधिनियम, १९५४–महाराष्ट्र विशोधन अधिनियम.

# वक्फ अधिनियम, १९५४

## (१९५४ चा अधिनियम क्रमांक २९)[४]

[२१ मे, १९५४]

**वक्फांचे अधिक चांगल्या प्रकारे प्रशासन व पर्यवेक्षण करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पाचव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'वक्फ अधिनियम, १९५४' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) ज्या राज्यावर हा अधिनियम विस्तारित करण्यात येईल त्या राज्यात तो, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या संबंधात नियत करील त्या [१]दिनांकापासून अंमलात येईल; आणि वेगवेगळ्या राज्यांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

परंतु, बिहार, [२]* * * उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांपैकी कोणत्याही राज्याबाबत अशी कोणतीही अधिसूचना संबंधित राज्य शासनाच्या शिफारशीखेरीज काढली जाणार नाही :

[३][परंतु आणखी असे की, 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) याअन्वये क्षेत्रीय बदल झाल्यामुळे १ नोव्हेंबर, १९५६ या दिवशी व तेव्हापासून हा अधिनियम एखाद्या राज्याच्या काही भागालाच लागू होत असेल तर, केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे हा अधिनियम त्या राज्याच्या बाकीच्या भागात अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकापासून अंमलात आणता येईल.]

---

१. १५ जानेवारी, १९५५—अजमेर, अंदमान व निकोबार बेटे, कूर्ग, हैद्राबाद, कच्छ, मध्यभारत, मद्रास, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब राज्यसंघ, त्रिपुरा व विंध्य प्रदेश—अधिसूचना क्रमांक एस.आर. ओ-५३, दिनांक ४ जानेवारी, १९५५, गॅझेट ऑफ इंडिया, असाधारण, भाग २, विभाग ३, पृष्ठ ७;

१ फेब्रुवारी, १९५५—आसाम व त्रावणकोर, कोचिन, १ एप्रिल, १९५५—आंध्र व राजस्थान अधिसूचना क्रमांक एस्.आर.ओ-२८२, दिनांक २२ जानेवारी, १९५५, गॅझेट ऑफ इंडिया, असाधारण, भाग २, विभाग ३, पृष्ठ १९९;

२० डिसेंबर, १९५५—भोपाळ अधिसूचना क्रमांक एस.आर.ओ-३६९६, दिनांक २० डिसेंबर, १९५५, गॅझेट ऑफ इंडिया, असाधारण, भाग २, विभाग ९, पृष्ठ २५०१;

१ जून, १९५८—ओरिसा अधिसूचना क्रमांक जी.एस्.आर्.-४२८, दिनांक २३ मे, १९५८, गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ ३१९;

१ ऑक्टोबर, १९६२—दिल्ली संघ राज्यक्षेत्र, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर.-१२८३, दिनांक २४ सप्टेंबर १९६२, गॅझेट ऑफ इंडिया, भाग दोन, विभाग ३(एक), पृष्ठ १४६४;

१२ एप्रिल, १९७३—बिहार, अधिसूचना क्रमांक जी.एस. आर.-१९७(ई), दिनांक ७ एप्रिल १९७३, गॅझेट ऑफ इंडिया, विशेष, भाग दोन, विभाग ३(एक), पृष्ठ ५३९;

१० ऑक्टोबर, १९५९—पंजाबचा उर्वरित भाग, अधिसूचना क्रमांक जीएसआर.-११२६, दिनांक १ ऑक्टोबर, १९५९—गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ १४०१;

१ नोव्हेंबर, १९५९—राजस्थानचा उर्वरित भाग, अधिसूचना क्रमांक जीएसआर.-१२०४, दिनांक २६ ऑक्टोबर, १९५९, गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ १५००;

९ जानेवारी, १९६०—मध्यप्रदेशाचा उर्वरित भाग, अधिसूचना क्रमांक जीएसआर.-४०, दिनांक २ जानेवारी, १९६०, गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ ४६;

१ डिसेंबर, १९६१—म्हैसूरचा उर्वरित भाग अधिसूचना क्रमांक जी.एस.आर.-१४३१, दिनांक २० नोव्हेंबर, १९६१, गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ १७६१;

२० नोव्हेंबर, १९६७, जेथे तो पूर्वीपासून अंमलात नाही असा हिमाचल प्रदेशातील प्रदेश—अधिसूचना क्रमांक एसओ-४०६२, दिनांक ८ नोव्हेंबर, १९६७, गॅझेट ऑफ इंडिया, भाग २, विभाग ३(एक), पृष्ठ ४२३५; आणि

१९६३ चा विनियम क्रमांक ६-कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे दादरा व नगर हवेली या प्रदेशांवर आणि १९६८ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ३ व अनुसूचीद्वारे पाँडेचरीवर हा अधिनियम विस्तारित करण्यात आला.

२. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३०-कलम २ द्वारे "दिल्ली" हा शब्द वगळण्यात आला.

३. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३०-कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. १९६१ चा मद्रास अधिनियम १९ द्वारे पुरवणी जोडण्यात आली.

अधिनियमाची प्रयुक्ती.

२. या अधिनियमाखाली अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, हा अधिनियम सर्व वक्फांना लागू होईल--मग त्या वक्फांची निर्मिती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी केलेली असो किंवा नंतर केलेली असो :

परंतु, ज्याला [1][ 'दर्गा ख्वाजा साहेब अधिनियम, १९५५' (१९५५ चा ३६) लागू आहे] तो दर्गा ख्वाजा साहेब, अजमेर याला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

व्याख्या.

३. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,--

(क) "हिताधिकारी" याचा अर्थ, ज्यांच्या फायद्यासाठी वक्फ निर्माण करण्यात येतो ती व्यक्ती किंवा ते उद्दिष्ट असा आहे, आणि त्यात, धार्मिक, पवित्र आणि धर्मादाय उद्दिष्टे आणि [2][मुस्लिम कायद्याला मंजूर असलेल्या] अन्य कोणत्याही लोकोपयोगी उद्दिष्टांचा समावेश आहे ;

(ख) "लाभ" यामध्ये कोणत्याही मुतवल्लीस तो असा मुतवल्ली आहे एवढ्याच केवळ कारणाने ज्यावर हक्क सांगता येईल असा कोणताही लाभ समाविष्ट नाही;

(ग) "मंडळ" याचा अर्थ, [3][कलम ९-पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (१क) याखाली] स्थापन झालेले वक्फ मंडळ असा आहे;

(घ) "आयुक्त" याचा अर्थ, कलम ४ खाली नियुक्त झालेला वक्फ आयुक्त असा आहे व त्यात कोणत्याही अतिरिक्त किंवा सहायक वक्फ आयुक्ताचा समावेश आहे;

[4][(घ घ) "परिषद" याचा अर्थ, कलम ८ क खाली स्थापन झालेली केंद्रीय वक्फ परिषद असा आहे ;]

(ङ) "सदस्य" याचा अर्थ, मंडळाचा सदस्य असा आहे व त्यात अध्यक्षाचा समावेश आहे;

(च) "मुतवल्ली" याचा अर्थ, तोंडी किंवा ज्याच्याद्वारे वक्फ निर्माण करण्यात आला अशा कोणत्याही विलेखाच्या किंवा संलेखाच्या खाली अथवा एखाद्या सक्षम प्राधिकरणाद्वारे एखाद्या वक्फाचा मुतवल्ली म्हणून नियुक्त करण्यात आली असेल अशी कोणतीही व्यक्ती असा आहे आणि त्यात, नायब-मुतवल्ली, खादिम, मुजावर, सज्जादनशीन, अमीन किंवा मुतवल्लीची कर्तव्ये पार पाडण्यासाठी मुतवल्लीने नियुक्त केलेली अन्य व्यक्ती आणि या अधिनियमात अन्यथा उपबंधित असेल ते अबाधित ठेवून, त्या त्या काळी वक्फाच्या संपत्तीचे तशी संपत्ती म्हणून व्यवस्थापन किंवा प्रशासन करणारी कोणतीही व्यक्ती किंवा समिती यांचा समावेश आहे;

[5][(छ) "निव्वळ वार्षिक उत्पन्न" याचा कोणत्याही वक्फाच्या संबंधातील अर्थ, त्याला वर्षाकाठी सर्व मार्गांनी येणारे ठोक उत्पन्न असा असून त्यातून फक्त पुढील गोष्टी वगळण्यात आल्या आहेत :--

(एक) शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला प्रदेय असतील ते जमीन-महसूल, उपकर, पट्टया व कर; आणि

(दोन) ज्या देणग्या किंवा उपहार वक्फाच्या मूलधनाचा भाग व्हावा अशा निदेशासह देण्यात आलेले आहेत त्या देणग्या किंवा उपहार :

परंतु, अशा देणग्यांपासून किंवा उपहारांपासून काही व्याज किंवा उत्पन्न प्रोद्‌भूत होत असेल तर ठोक वार्षिक उत्पन्नाची परिगणना करताना ते हिशेबात घेतले जाईल ;]

(ज) "वक्फामध्ये हितसंबंधित असलेली व्यक्ती" याचा अर्थ, वक्फामधून कोणतेही आर्थिक किंवा अन्य लाभ मिळण्यास हक्कदार असेल अशी कोणतीही व्यक्ती असा आहे व त्यात--

(एक) वक्फाशी संबंधित अशी मशीद, ईदगाह, इमामवाडा, दर्गा, खानगाह, मकबरा, कबरस्तान किंवा इतर कोणतीही धार्मिक संस्था यांमध्ये उपासना करण्याचा किंवा कोणतेही धार्मिक कृत्य करण्याचा अथवा वक्फाखालील कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेत सहभागी होण्याचा जिला अधिकार असतो अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) वाकीफ आणि वाकीफचा कोणताही वंशज आणि मुतवल्ली,

यांचा समावेश आहे ;

(झ) [6][प्रकरण २ रे-क खेरीजकरून इतरत्र] "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांनी विहित केलेला असा आहे, आणि त्यात या अधिनियमाखाली मंडळाने केलेल्या विनियमांचा समावेश आहे;

(ञ) "शिया वक्फ" याचा अर्थ, शिया कायद्याद्वारे नियंत्रित होणारा वक्फ असा आहे;

(ट) "सुनी वक्फ" याचा अर्थ, सुनी कायद्याद्वारे नियंत्रित होणारा वक्फ असा आहे;

---

१. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८-कलम २ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी घातले.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम २ द्वारे "मुस्लिम समाजाच्या लाभासाठी स्थापन केलेल्या" या मजकुराऐवजी घातले.

३. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम २ द्वारे "कलम ९ खाली" या मजकुराऐवजी घातले.

४. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८-कलम ३ द्वारे खंड (छ) ऐवजी (भूतलक्षी परिणामासह) दाखल करण्यात आले.

६. १९६४ चा अधिनियम क्रमांक ६४-कलम २ द्वारे समाविष्ट केले.

(ठ) "वक्फ" याचा अर्थ, इस्लाम धर्म प्रतिज्ञापित करणाऱ्या व्यक्तीने मुस्लिम कायद्याप्रमाणे पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय म्हणून मान्यता पावलेल्या कोणत्याही उद्दिष्टाप्रीत्यर्थ केलेले कोणत्याही जंगम किंवा स्थावर संपत्तीचे समर्पण असा आहे व त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) वहिवाटनिर्मित वक्फ;

[१][(दोन) मुस्लिम कायद्यानुसार पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय म्हणून मान्यता पावलेल्या कोणत्याही उद्दिष्टाप्रीत्यर्थ असलेली (मश्रुत-उल-खिदमत यासुद्धा) अनुदाने; आणि]

(तीन) मुस्लिम कायद्यानुसार पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय म्हणून मान्यता पावलेल्या कोणत्याही उद्दिष्टाप्रीत्यर्थ संपत्ती ज्या मर्यादेपर्यंत समर्पित करण्यात आली आहे त्या मर्यादेपर्यंत वक्फ-अलाल-औलाद;

आणि "वाकीफ" याचा अर्थ, असे समर्पण करणारी कोणतीही व्यक्ती असा आहे;

(ड) "वक्फनामा" याचा अर्थ, ज्याद्वारे वक्फ निर्माण करण्यात आला आहे असा कोणताही विलेख किंवा संलेख असा आहे आणि त्यात, ज्यामुळे समर्पणाच्या कोणत्याही अटींमध्ये बदल झाला आहे अशा कोणत्याही उत्तरवर्ती विधिग्राह्य विलेखाचा किंवा संलेखाचा समावेश आहे.

---

## प्रकरण २ रे

### वक्फांचे सर्वेक्षण

**वक्फांचे प्राथमिक सर्वेक्षण.**

४. (१) राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्यासाठी एक वक्फ आयुक्त आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकी राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फांचे सर्वेक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील तितके अतिरिक्त किंवा सहायक वक्फ आयुक्त यांची नियुक्ती करता येईल.

(२) सर्व अतिरिक्त व सहायक वक्फ आयुक्त या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये वक्फ आयुक्ताच्या सर्वसाधारण पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली पार पाडतील.

(३) स्वतःला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर आयुक्त [२][राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकी अस्तित्वात असलेल्या वक्फाच्या बाबतीतील] आपला अहवाल राज्य शासनाला सादर करील, त्यात पुढील तपशील असेल, तो असा :—

(क) [३][राज्यातील किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या कोणत्याही भागातील] वक्फांची संख्या— त्यात शिया वक्फ व सुन्नी वक्फ स्वतंत्रपणे दाखवलेले असतील;

(ख) प्रत्येक वक्फाचे स्वरूप व उद्दिष्टे;

(ग) प्रत्येक वक्फामध्ये समाविष्ट असलेल्या संपत्तीचे ठोक उत्पन्न;

(घ) अशा संपत्तीच्या संबंधात प्रदेय असलेली जमीन-महसूल, उपकर, पट्टा आणि कर यांची रक्कम;

(ङ) प्रत्येक वक्फाचे उत्पन्न मिळवण्यासाठी येणारा खर्च व त्याच्या मुतवल्लीचे वेतन किंवा अन्य पारिश्रमिक ; आणि

(च) विहित करण्यात येईल असा प्रत्येक वक्फासंबंधीचा अन्य तपशील.

(४) कोणतीही चौकशी करीत असताना, आयुक्ताला पुढील बाबींच्या संबंधात, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयाकडे निहित केलेल्या अशाच शक्ती असतील, त्या बाबी अशा :—

(क) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठवून बोलावणे आणि त्याची तपासणी करणे;

(ख) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व तो सादर करावयास फर्मावणे;

(ग) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागवणे;

(घ) कोणत्याही साक्षीदाराची किंवा हिशेबांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे;

(ङ) कोणतीही स्थानिक तपासणी किंवा स्थानिक अन्वेषण करणे;

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(५) अशी कोणतीही चौकशी चालू असताना जर विशिष्ट वक्फ हा शिया वक्फ आहे की सुन्नी वक्फ आहे याबाबत काही तंटा निर्माण झाला आणि वक्फनाम्यात त्याच्या स्वरूपाविषयी स्पष्ट निर्देश असतील तर अशा विलेखाच्या आधारे तंट्याचा निर्णय केला जाईल.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम २ द्वारे उपखंड (दोन) ऐवजी घातले.

२. १८६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ४ द्वारे (भूतलक्षी परिणामासह) समाविष्ट करण्यात आले.

३. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ४ द्वारे "राज्यातील" या मजकुराऐवजी (भूतलक्षी परिणामासह) घातले.

वक्फांच्या सूचीचे प्रकाशन.

५. (१) कलम ४-पोटकलम ३ खालील अहवाल मिळाल्यावर राज्य शासन, त्याची एक प्रत मंडळाकडे अग्रेषित करील.

(२) मंडळ, पोटकलम (१) खाली त्याच्याकडे अग्रेषित करण्यात आलेला अहवाल तपासून, [१][राज्यात किंवा, प्रकरणपरत्वे, राज्यातील ज्या भागाशी हा अहवाल संबंधित असेल त्या भागात अस्तित्वात असलेल्या] वक्फांची सूची, विहित करण्यात येतील त्या तपशिलांसह प्रकाशित करील.

वक्फासंबंधीचे तंटे.

६. (१) [२][कलम ५ च्या पोटकलम (२) खाली प्रकाशित करण्यात आलेल्या वक्फ सूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली एखादी विशिष्ट संपत्ती वक्फ-संपत्ती आहे किंवा नाही अथवा अशा सूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला वक्फ हा शिया वक्फ आहे की सुनी वक्फ आहे], असा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, मंडळ किंवा वक्फाचा मुतवल्ली किंवा त्यामध्ये हितसंबंधित अशी कोणीही व्यक्ती यांना या प्रश्नाच्या निर्णयासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल आणि अशा बाबतीत त्या दिवाणी न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल:

परंतु, कलम ५-पोटकलम (२) खाली वक्फ सूची प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष संपल्यानंतर दिवाणी न्यायालय असा कोणताही दावा विचारार्थ स्वीकारणार नाही:

[३][परंतु, आणखी असे की, राज्याच्या कोणत्याही भागासंबंधीच्या आणि 'वक्फ (विशोधन) अधिनियम, १९६९' याच्या प्रारंभापूर्वी जी प्रकाशित झाली आहे किंवा प्रकाशित झाली असल्याचे दिसते त्या वक्फ सूचीच्या बाबतीत दिवाणी न्यायालयाला अशा प्रारंभापासून एक वर्षाच्या आत असा दावा स्वीकारता येईल.]

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वक्फासंबंधीची या अधिनियमाखालील कार्यवाही, केवळ असा कोणताही दावा किंवा कोणतेही अपील किंवा अशा दाव्यातून उद्‌भवणारी कोणतीही कार्यवाही प्रलंबित आहे एवढ्याच कारणावरून स्थगित करण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) खालील कोणत्याही दाव्यामध्ये आयुक्त हा पक्षकार केला जाणार नाही आणि या अधिनियमाला किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत त्याच्याविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(४) कलम ५-पोटकलम (२) खाली प्रकाशित करण्यात आलेल्या वक्फ सूचीत, पोटकलम (१) खाली दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला अनुसरून बदल झाला नसेल तर, ती अंतिम व निर्णायक असेल.

सर्वेक्षणाच्या खर्चाची वसुली.

७. (१) या प्रकरणाखाली [४][[५][वक्फ सूची किंवा सूच्या प्रकाशित करण्याच्या] खर्चासह] सर्वेक्षण करण्याचा एकूण खर्च हा [६][ज्यांचे निव्वळ वार्षिक उत्पन्न शंभर रुपयांपेक्षा अधिक आहे अशा वक्फांचे सर्व मुतवल्ली, राज्यामध्ये अशा वक्फांना मिळणाऱ्या निव्वळ वार्षिक उत्पन्नाच्या प्रमाणात सोसतील] व हे प्रमाण आयुक्ताने निर्धारित केलेले असेल.

(२) ज्याद्वारे वक्फ निर्माण करण्यात आला त्या विलेखामध्ये किंवा संलेखामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही मुतवल्लीला पोटकलम (१) खाली आपणांकडून देय असलेली कोणतीही रक्कम त्या वक्फाच्या उत्पन्नामधून भरता येईल.

(३) पोटकलम (१) खाली मुतवल्लीकडून देय असलेली कोणतीही रक्कम, राज्य शासनाने प्रमाणपत्र दिल्यावर जमीन-महसुलाच्या थकबाकीच्याच पद्धतीप्रमाणे वक्फामध्ये समाविष्ट असणाऱ्या संपत्तीतून वसूल करता येईल.

प्रकरण २ रे विवक्षित राज्यांना लागू नाही.

८. ज्या राज्यात तेथे अस्तित्वात असलेल्या वक्फ संपत्तींचे सर्वेक्षण त्या राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली करण्यात आले असेल अशा कोणत्याही राज्याला या प्रकरणाचे उपबंध लागू होणार नाहीत.

---

१. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ५ द्वारे "राज्यात अस्तित्वात असलेल्या" या मजकुराऐवजी (भूतलक्षी परिणामासह) घातले.

२. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ६ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी (भूतलक्षी परिणामासह) घातले.

३. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

४. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३८—कलम ७ द्वारे "वक्फ सूच्या प्रकाशित करण्याच्या" या मजकुराऐवजी घातले.

६. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ७ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी घातले.

[1][प्रकरण २ रे-क

## केंद्रीय वक्फ परिषद

**८क.** (१) मंडळाचे कामकाज आणि वक्फाचे योग्य प्रशासन यांच्याशी संबंधित अशा बाबींवर केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे 'केंद्रीय वक्फ परिषद' नावाची एक परिषद स्थापन करता येईल. केंद्रीय वक्फ परिषदेची स्थापना आणि घटना.

(२) या परिषदेमध्ये एक अध्यक्ष—तो वक्फांचा प्रभारी केंद्रीय मंत्री असेल—आणि केंद्र शासन नियुक्त करील असे जास्तीत जास्त वीस इतके अन्य सदस्य असतील.

(३) परिषदेच्या सदस्यांचा पदावधी, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि निमित्तवशात् रिकामी होणारी त्यांची पदे भरण्याची रीत केंद्र शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

**८ख.** (१) प्रत्येक मंडळ आपल्या वक्फ निधीमधून दर वर्षी, ज्यांच्या बाबतीत कलम ४६ पोट-कलम (१) खाली अंशदान प्रदेय असेल अशा वक्फांच्या [2]* * * निव्वळ एकवट वार्षिक उत्पन्नाच्या एक टक्क्याइतके अंशदान परिषदेला देईल : परिषदेची वित्त-व्यवस्था.

परंतु, जेव्हा मंडळाने एखाद्या विशिष्ट वक्फाच्या बाबतीत कलम ४६-पोटकलम (२) खाली त्याच कलमाच्या पोट कलम (१) खाली प्रदेय असलेले संपूर्ण अंशदान माफ केले असेल तेव्हा, ज्याच्या बाबतीत अशी माफी देण्यात आली होती त्या [3][वक्फाचे] निव्वळ वार्षिक उत्पन्न त्या कलमाखाली परिषदेला प्रदेय असलेले अंशदान परिगणना करून ठरवताना हिशेबात घेतले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली परिषदेला मिळालेल्या सर्व रकमा आणि देणग्या, धर्मदाने व अनुदाने म्हणून त्याला मिळालेल्या अन्य सर्व रकमा यांचा मिळून 'मध्यवर्ती वक्फ निधी' या नावाचा एक निधी तयार होईल.

(३) केंद्र शासन यासंबंधात करील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, मध्यवर्ती वक्फ निधी हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असेल आणि परिषदेला योग्य वाटेल अशा प्रयोजनांकरिता त्याचा विनियोग करता येईल.

**८ग.** (१) परिषद, केंद्र शासनाने केलेल्या नियमांमध्ये विहित करण्यात येतील अशी हिशेब-पुस्तके आणि आपल्या हिशेबासंबंधीची अन्य पुस्तके तशा विहित नमुन्यात व तशा विहित रीतीने ठेवील. हिशेब आणि लेखा-परीक्षा.

(२) केंद्र शासन नियुक्त करील अशा लेखापरीक्षकांकरवी परिषदेच्या हिशेबांची दरवर्षी लेखा-परीक्षा आणि तपासणी केली जाईल.

(३) लेखापरीक्षेचा खर्च मध्यवर्ती वक्फ निधीतून दिला जाईल.

**८घ.** (१) केंद्र शासनाला या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत:, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क्) परिषदेच्या सदस्यांचा पदावधी, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि निमित्तवशात् रिकामी होणारी त्यांची पदे भरण्याची रीत;

(ख्) केंद्रीय वक्फ निधीवर नियंत्रण ठेवणे आणि त्याचा विनियोग करणे ;

(ग्) परिषदेचे हिशेब कसे ठेवले जातील तो नमुना व ती रीत.

(३) या प्रकरणाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत ते सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमामध्ये कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४–कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९६८ चा अधिनियम क्रमांक ३८–कलम ८ द्वारे "संपत्तींच्या" हा शब्द वगळण्यात आला.

३. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "वक्फाच्या संपत्तीचे" या मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण ३ रे

### मंडळांची स्थापना आणि त्यांची कार्ये

निगमन.

९. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबत नियत करील अशा दिनांकी व तेव्हापासून, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाखाली एक वक्फ मंडळ स्थापन करण्यात येईल.

[1][(१क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही राज्यातील शिया वक्फ, संख्येने त्या राज्यातील एकूण सर्व वक्फांच्या संख्येच्या पंधरा टक्क्यांहून अधिक असतील किंवा राज्यातील शिया वक्फांच्या संपत्तीला मिळणारे उत्पन्न राज्यातील सर्व वक्फांच्या संपत्तीच्या एकूण उत्पन्नाच्या पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक असेल तर, राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे शिया वक्फांसाठी आणि सुनी वक्फांसाठी अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा नावांखाली प्रत्येकी वेगवेगळे मंडळ स्थापन करता येईल आणि अशा बाबतीत या अधिनियमाचे उपबंध त्या राज्याला लागू होताना अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली विशोधने जणू काही त्यांमध्ये झालेली असावीत त्याप्रमाणे ते उपबंध परिणामक होतील ]

(२) [2][मंडळ ] हा, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीनतेने संपत्ती संपादन व धारण करण्याच्या, तसेच ती हस्तांतरित करण्याच्या शक्तींसहित, उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला निगम-निकाय असेल आणि उक्त नावाने तो दावा लावील व त्याच्यावर दावा लावण्यात येईल.

मंडळाची रचना.

१०. [3][(१) मंडळ हे—

(क) एखाद्या राज्याच्या किंवा दिल्ली या संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत अकरा सदस्य; आणि

(ख) अन्य कोणत्याही संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत पाच सदस्य

मिळून बनलेले असेल. ]

(२) मंडळाचा एक अध्यक्ष असेल व तो सदस्यांनी आपल्यातून निवडून दिलेला असेल.

सदस्यांची नियुक्ती.

**११.** राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा त्याहून अधिक व्यक्तिवर्गांमधून मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती करील, ते असे :—

(क) राज्य विधानमंडळाचे सदस्य आणि त्या राज्याचे प्रतिनिधित्व करणारे संसदेचे सदस्य;

(ख) मुस्लिम कायद्याचे [4] * * * ज्ञान असणाऱ्या आणि राज्य जमियत-उल-उलमा-इ-हिंद यासारख्या संघटनांचे (मग यातील व्यक्ती हनाफी किंवा अहले हादीस असोत वा शफी असोत) किंवा राज्य शिया परिषदेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती;

(ग) प्रशासन, वित्तव्यवस्था किंवा कायदा यांचे [4] * * * ज्ञान असणाऱ्या व्यक्ती;

(घ) राज्यात असलेल्या वक्फांचे मुतवल्ली :

परंतु कोणत्याही परिस्थितीत, मंडळावर एकाहून अधिक मुतवल्ली नियुक्त करता येणार नाहीत :

परंतु आणखी असे की, मंडळावरील सुनी सदस्य किंवा शिया सदस्य यांची संख्या ठरवताना, राज्य शासन मंडळाने प्रशासित करावयाचे सुनी वक्फ व शिया वक्फ यांची संख्या व मूल्य लक्षात घेईल.

पदावधि.

**१२.** मंडळाचे सदस्य पाच वर्षांपर्यंत पद धारण करतील :

परंतु, एखादा सदस्य त्याचा पदावधी समाप्त झाला तरी त्याच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती **शासकीय राजपत्रात** अधिसूचित होईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवील.

मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्त होण्याच्या किंवा ते सदस्यत्व चालू राहण्याच्या प्रयोजनार्थ निरर्हता.

**१३.** एखादी व्यक्ती मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास किंवा ते सदस्यत्व चालू राहण्यास खालील कारणांमुळे निरर्ह होईल :—

(क) जर ती मुसलमान नसेल आणि वयाने एकवीस वर्षांहून कमी असेल तर;

(ख) जर ती विकल मनाची व्यक्ती असल्याचे आढळून आले तर;

(ग) जर ती अविमुक्त दिवाळखोर असेल तर;

(घ) जर ती व्यक्ती नैतिक अध:पतन अनुस्यूत असणाऱ्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरली असेल तर;

(ङ) जर पूर्वी एखाद्या प्रसंगी, गैरव्यवस्थापन किंवा भ्रष्टाचार याबद्दल तिला सदस्याच्या पदावरून काढून टाकण्यात आले असेल अथवा सक्षम न्यायालयाच्या आदेशाद्वारे एखाद्या विश्वासापेक्षी स्थानावरून काढून टाकण्यात आले असेल तर.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ५ द्वारे " उक्त मंडळ " याऐवजी घातले.

३. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३०—कलम ३ द्वारे पोटकलम (१) ऐवजी समाविष्ट करण्यात आले.

४. १९६४ चा अधिनियम ३४—कलम ६ द्वारे " विशेष " हा शब्द वगळण्यात आला.

१४. (१) विहित असेल त्या ठिकाणी व त्या वेळी कामकाज चालवण्यासाठी मंडळाच्या सभा होतील. **मंडळाच्या सभा.**

(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत सदस्यांनी आपल्यापैकी निवडून दिलेला कोणताही सदस्य मंडळाच्या सभेत अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, मंडळाच्या कोणत्याही सभेत मांडल्या जाणाऱ्या प्रश्नावर उपस्थित सदस्य बहुमताने निर्णय घेतील आणि समसमान मते पडली तर त्याबाबतीत अध्यक्षाला किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्ष असणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीला दुसरा किंवा निर्णायक मताधिकार असेल.

१५. (१) या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, एखाद्या राज्यातील सर्व वक्फांचे सर्वसाधारण अधीक्षण करण्याची शक्ती त्या राज्यासाठी स्थापन झालेल्या मंडळाच्या ठायी निहित राहील; आणि आपल्या अधीक्षणाखाली असणारे वक्फ सुस्थितीत ठेवले जाण्याची, नियंत्रिले आणि प्रशासिले जाण्याची आणि ज्या उद्दिष्टांकरिता व प्रयोजनांकरिता असे वक्फ निर्माण केले होते किंवा उद्देशित होते त्यांकरिता त्यांचे उत्पन्न रीतसर उपयोजिले जाण्याची निश्चिती होईल अशाप्रकारे या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर करणे हे मंडळाचे कर्तव्य असेल : **मंडळाची कार्ये.**

परंतु, मंडळ कोणत्याही वक्फाच्या संबंधात या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर करताना, वाकीफांचे निदेश, वक्फाची प्रयोजने व मुस्लिम कायद्याला मंजूर असलेला वक्फाचा कोणताही परिपाठ किंवा रूढी यांना अनुसरून असे कार्य करील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, मंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क्) प्रत्येक वक्फाची उत्पत्ती, प्राप्ती, उद्दिष्ट आणि हिताधिकारी यांच्याविषयी माहिती अंतर्भूत असलेला अभिलेख ठेवणे ;

(ख्) वक्फ ज्यासाठी निर्माण करण्यात आले किंवा उद्देशित होते त्याच उद्दिष्टांकरिता व प्रयोजनांकरिता अशा वक्फांचे उत्पन्न व अन्य संपत्ती उपयोजित केली जात असल्याची खात्री करून घेणे;

(ग्) वक्फांच्या प्रशासनाकरिता निदेश देणे;

(घ्) वक्फाच्या व्यवस्थापनाकरिता योजना नक्की करणे :

परंतु, संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही योजना नक्की केली जाणार नाही.

(ङ्) [१] [(एक) वक्फाच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशा रीतीने वक्फाच्या अतिरिक्त उत्पन्नाच्या विनियोगाबाबत निदेश देणे;

(दोन) ज्याची उद्दिष्टे कोणत्याही लेखी संलेखाद्वारे अभिव्यक्त झालेली नाहीत अशा वक्फाचे उत्पन्न कोणत्या पद्धतीने वापरले जावे त्याबाबत निदेश देणे ;

(तीन) वक्फाच्या एखाद्या उद्दिष्टाचे अस्तित्व संपुष्टात आले असेल, किंवा ते साध्य करणे अशक्य झाले असेल तर अशा बाबतीत, त्या उद्दिष्टासाठी वक्फाचे जितके उत्पन्न पूर्वी उपयोजित केले जात होते ते आता मूळ उद्दिष्टासारख्याच किंवा व्यवहार्य असेल तितपत तशासारख्याच कोणत्याही उद्दिष्टासाठी उपयोजित करण्यात यावे असा निदेश देणे :

परंतु, संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय या खंडाखाली कोणताही निदेश दिला जाणार नाही.]

**स्पष्टीकरण** :—या खंडाच्या प्रयोजनार्थ, मंडळाच्या शक्तींचा वापर,—

(एक) सुनी वक्फाच्या बाबतीत, मंडळातील केवळ सुनी सदस्य करतील; आणि

(दोन) शिया वक्फाच्या बाबतीत, मंडळातील केवळ शिया सदस्य करतील :

परंतु, मंडळातील शिया किंवा सुनी सदस्यांची संख्या व अन्य परिस्थिती लक्षात घेता, मंडळाच्या शक्तींचा वापर केवळ अशाच सदस्यांनी करता कामा नये असे मंडळाला वाटेल तेथे, ते स्वत:स योग्य वाटेल त्याप्रमाणे सुनीपंथी किंवा, प्रकरणपरत्वे, शियापंथी असलेल्या अन्य मुसलमानांना, या खंडाखालील मंडळाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी मंडळाचे तात्पुरते सदस्य म्हणून स्वीकृत करू शकेल;

(च्) मुतवल्लींनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची छाननी करून त्याला मान्यता देणे आणि वक्फांच्या लेखापरीक्षेची व्यवस्था करणे ;

(छ्) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार मुतवल्लींची नेमणूक करणे किंवा त्यांना काढून टाकणे;

(ज्) कोणत्याही वक्फाची गहाळ संपत्ती परत मिळवण्याबाबत उपाययोजना करणे;

(झ्) वक्फाच्या संबंधात न्यायालयात दावे व कार्यवाही मांडणे आणि त्याबाबतीत बचाव देणे;

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम ७ अन्वये विवक्षित मजकुराऐवजी घातले.

[1][ (ञ) कलम ३६क अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे विक्री, देणगी, गहाण, विनिमय किंवा भाडेपट्टा या मार्गाने केलेल्या वक्फाच्या कोणत्याही हस्तांतरणास मुस्लिम कायद्यानुसार मंजुरी देणे :

परंतु मंडळातील निदान दोन-तृतीयांश सदस्यांनी अशा कोणत्याही व्यवहारास अनुकूल मत दिल्याशिवाय त्यांना मंजुरी देण्यात येणार नाही.]

(ट) वक्फ निधीचे प्रशासन करणे;

(ठ) मंडळाला वेळोवेळी आवश्यक वाटतील अशी प्रतिवेदने, आकडेवारी, हिशेब आणि इतर माहिती मुतवल्लींकडून मागवणे;

(ड) वक्फाची संपत्ती, हिशेब किंवा अभिलेख किंवा विलेख आणि त्यासंबंधीचे दस्तऐवज यांची तपासणी करणे किंवा करवणे;

(ढ) वक्फाचे किंवा वक्फाच्या संपत्तीचे अन्वेषण करणे, स्वरूप आणि व्याप्ती ठरवणे आणि आवश्यक असेल तेव्हा वक्फ-संपत्तीचे सर्वेक्षण करवणे;

(ण) सर्वसाधारणपणे, वक्फाचे योग्य प्रकारे नियंत्रण करणे, देखभाल करणे आणि प्रशासन करणे यांसाठी आवश्यक असतील त्या सर्व कृती करणे.

(३) जर मंडळाने पोटकलम (२)-खंड (घ) खाली कोणतीही व्यवस्थापन योजना नक्की केली असेल किंवा पोटकलम (२)-खंड(ङ) खाली कोणताही निदेश दिला असेल तर, त्या वक्फामध्ये हितसंबंधित असणाऱ्या किंवा अशा निश्चितीमुळे किंवा निदेशामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला अशी निश्चिती किंवा निदेश रद्द ठरवला जावा यासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या एखाद्या दिवाणी न्यायालयात दावा मांडता येईल आणि दिवाणी न्यायालयाचा या बाबतीतील निर्णय अंतिम असेल.

मंडळाच्या समित्या.

१६. (१) मंडळ, त्यास आवश्यक वाटेल त्या त्या वेळी सामान्यत: किंवा विशेष प्रयोजनार्थ किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता वक्फांच्या पर्यवेक्षणासाठी समित्या स्थापन करू शकेल.

(२) मंडळ अशा समित्यांची घटना, कार्ये आणि कर्तव्ये वेळोवेळी निश्चित करील :

परंतु, अशा समित्यांच्या सदस्यांनी मंडळाचे सदस्य असणे आवश्यक असणार नाही.

अध्यक्षाचा आणि सदस्यांचा राजीनामा.

१७. अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य राज्य शासनाला उद्देशून लिहिलेल्या स्वहस्ताक्षरित लेखाद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल :

परंतु, आपल्या उत्तराधिकाऱ्याची नेमणूक **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केली जाईपर्यंत, अध्यक्ष किंवा सदस्य आपले पदकार्य चालू ठेवील.

अध्यक्षाला आणि सदस्यांना काढून टाकणे.

१८. (१) मंडळाचा अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य—

(क) कलम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हतेला पात्र असेल किंवा होईल तर; किंवा

(ख) कार्य करण्यास नकार देईल किंवा अशा रीतीने कार्य करील की त्याबद्दलचे त्याचे कोणतेही स्पष्टीकरण ऐकल्यानंतरही ती रीत वक्फाच्या हितसंबंधास बाधक आहे असे राज्य शासनाला वाटले तर; किंवा

(ग) मंडळाच्या मते पुरेशी होईल अशी सबब न देता मंडळाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना उपस्थित राहिला नसेल तर,

राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याला काढून टाकू शकेल.

(२) मंडळाच्या अध्यक्षाला पोटकलम (१) खाली काढून टाकण्यात येईल तेव्हा, त्याचे मंडळाचे सदस्यत्व सुद्धा संपुष्टात येईल.

रिक्त पदे भरणे.

१९. जेव्हा एखाद्या सदस्याची जागा त्याला काढून टाकल्यामुळे, त्याच्या राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा अन्यथा रिक्त होईल तेव्हा, त्याच्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करण्यात येईल व असा नवीन सदस्य, ज्याच्या जागी तो आला असेल तो सदस्य जर अशी पदरिक्तता घडून आली नसती तर जोपर्यंत असे पद धारण करण्यास हक्कदार राहिला असता तोपर्यंत ते पद धारण करील.

सदस्यकुलामधील रिक्त पदे किंवा घटनेतील दोष यांमुळे मंडळाच्या कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.

२०. मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ त्याच्या सदस्यकुलामध्ये रिक्त पदे आहेत किंवा त्याच्या घटनेत काही दोष आहे एवढ्याच कारणास्तव विधिबाह्य होणार नाही.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम ७ द्वारे खंड (ञ) ऐवजी दाखल करण्यात आले.

२१. (१) मंडळाचा एक सचिव असेल व तो मुसलमान असेल आणि मंडळाचा विचार घेऊन राज्य शासन त्याची नियुक्ती करील. मंडळाचा सचिव आणि अन्य अधिकारी.

(२) सचिव हा मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो मंडळाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असेल.

(३) मंडळाला, या अधिनियमाखालील आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडता यावीत यासाठी आवश्यक वाटतील असे अन्य काही अधिकारी व कर्मचारी नियुक्त करता येतील.

२२. मंडळ, एका सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे, या अधिनियमाखाली आवश्यक वाटतील अशा शक्ती किंवा कर्तव्ये अध्यक्षाला किंवा कोणत्याही सदस्याला किंवा सचिवाला किंवा मंडळाच्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला किंवा [१] [मंडळाच्या कोणत्याही समितीला], आदेशामध्ये विनिर्दिष्ट केल्या असतील अशा शर्ती किंवा मर्यादा (काही असल्यास) यांच्या अधीनतेने प्रत्यायोजित करू शकेल. प्रत्यायोजन.

२३. (१) मंडळ, त्याच्या कार्यवाहीची किंवा त्याच्या अभिरक्षेत असलेल्या अभिलेखाची तपासणी करण्यास आणि विहित केली जाईल अशी फी भरण्यात आल्यानंतर आणि अशा शर्तींच्या अधीनतेने अभिलेखाच्या नकला देण्यास अनुमती देऊ शकेल. अभिलेखाची तपासणी करणे आणि त्याच्या नकला देणे.

(२) या कलमाखाली देण्यात आलेल्या सर्व नकला मंडळाच्या सचिवाकडून 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १)-कलम ७६ मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने प्रमाणित करण्यात येतील.

[२] [(३) पोटकलम (३) द्वारे सचिवाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर मंडळ याबाबत सामान्यतः किंवा विशेषतः प्राधिकृत करील अशा मंडळाच्या अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांनाही करता येईल.]

२४. याद्वारे असे घोषित करण्यात येते की, अध्यक्ष किंवा सदस्य ही पदे धारण करणाऱ्या व्यक्ती त्या पदांमुळे संसदेचे सदस्य म्हणून निवडल्या जाण्यास किंवा संसदेचे सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाहीत, तसेच त्या कधीकाळी निरर्ह होत्या असे मानले जाणार नाही. संसदेच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हतेस प्रतिबंध.

## प्रकरण ४ थे

### वक्फांची नोंदणी

२५. (१) प्रत्येक वक्फ--मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर निर्माण झालेला असो--मंडळाच्या कार्यालयात नोंदण्यात येईल. नोंदणी.

(२) नोंदणीसाठी मुतवल्लीकडून अर्ज करण्यात येईल :

परंतु, वाकीफ किंवा त्याचे वंशज किंवा वक्फाचा हिताधिकारी किंवा असा वक्फ ज्या संप्रदायाचा आहे त्या संप्रदायातील कोणीही मुसलमान व्यक्ती यांना असे अर्ज करता येतील.

(३) नोंदणीसाठी करावयाचा अर्ज मंडळ विहित करील अशा नमुन्यात आणि अशा पद्धतीने आणि अशा ठिकाणी करण्यात येईल आणि त्यात शक्य असेल तेथवर खालील तपशील अंतर्भूत असेल,--

(क्) वक्फांच्या संपत्तींचे त्या ओळखता येतील इतके पुरेसे वर्णन;

(ख्) अशा संपत्तींपासून मिळणारे ठोक वार्षिक उत्पन्न;

(ग्) जमीन-महसूल व उपकर आणि वक्फांच्या संपत्तीच्या बाबतींत दरवर्षी प्रदेय असलेल्या सर्व पट्टया आणि कर यांची रक्कम;

(घ्) वक्फाच्या संपत्तीचे उत्पन्न वसूल करण्यासाठी दरवर्षी कराव्या लागणाऱ्या खर्चाचा अंदाज;

(ङ्) वक्फांखाली पुढील बाबींसाठी वेगळी काढून ठेवण्यात आलेली रक्कम--

(एक) मुतवल्लीचे वेतन आणि व्यक्तींचे भत्ते;

(दोन) निखळ धार्मिक प्रयोजने;

(तीन) धर्मादाय प्रयोजने; आणि

(चार) अन्य कोणतीही प्रयोजने;

(च्) मंडळाने विहित केलेला अन्य कोणताही तपशील.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(४) अशा प्रत्येक अर्जासोबत वक्फनाम्याची एक प्रत असेल, अथवा असा कोणताही विलेख निष्पादित करण्यात आला नसेल किंवा त्याची प्रत उपलब्ध नसेल तर त्यात अर्जदारास माहीत असलेला, वक्फाची उत्पत्ती, त्याचे स्वरूप आणि उद्दिष्टे यांबाबतचा सर्व तपशील समाविष्ट केला जाईल.

(५) पोटकलम (२) खाली करण्यात येणारा प्रत्येक अर्ज हा, वादकथने स्वाक्षरित आणि सत्यापित करण्याबाबत 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) यामध्ये उपबंधित करण्यात आलेल्या पद्धतीने अर्जदार स्वाक्षरित व सत्यापित करील.

(६) मंडळ, त्याला आवश्यक वाटेल असा आणखी काही तपशील किंवा माहिती देणे अर्जदारास आवश्यक करू शकेल.

(७) नोंदणीसाठी अर्ज मिळाल्यावर त्या वक्फाची नोंदणी करण्यापूर्वी मंडळ, अर्जाच्या अस्सलपणा-बाबत आणि विधिग्राह्यतेबाबत आणि त्यातील कोणताही तपशील यथातथ्य आहे की नाही याबाबत त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि वक्फ-संपत्तीचे प्रशासन करणाऱ्या व्यक्तीहून अन्य कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असेल तर मंडळ, वक्फाची नोंदणी करण्यापूर्वी, वक्फ-संपत्तीचे प्रशासन करणाऱ्या व्यक्तीला अर्जाची सूचना देईल आणि अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची इच्छा असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेईल.

(८) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निर्माण करण्यात आलेल्या वक्फाच्या बाबतीत नोंदणीसाठी करण्यात आलेला प्रत्येक अर्ज अशा प्रारंभापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल आणि अशा प्रारंभा-नंतर निर्माण करण्यात आलेल्या वक्फांच्या बाबतीत त्याच्या निर्मितीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत असा अर्ज करण्यात येईल.

**वक्फ नोंदवही.**

२६. मंडळ एक वक्फ नोंदवही ठेवील व त्यात, प्रत्येक वक्फाच्या संबंधातील वक्फनाम्याच्या प्रती उपलब्ध असल्यास त्या प्रती आणि खालील तपशील अंतर्भूत असेल :—

(क्) वक्फाचा वर्ग;

(ख्) मुतवल्लीचे नाव;

(ग्) वक्फनाम्याखालील किंवा रूढीनुसार किंवा परिपाठानुसार मुतवल्लीच्या पदाच्या उत्तरा-धिकाराबाबतचा नियम;

(घ्) सर्व वक्फ-संपत्तीचा तपशील आणि सर्व हक्कलेख आणि तत्संबंधीचे दस्तऐवज;

(ङ) नोंदणीच्या वेळच्या प्रशासन योजनेचा, तसेच व्यय योजनेचा तपशील;

(च्) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील.

**एखादी संपत्ती ही वक्फ-संपत्ती आहे किंवा कसे या-बाबतचा निर्णय.**

२७. (१) एखादी संपत्ती वक्फ-संपत्ती आहे असे समजण्यास मंडळाला कारण असेल तर, मंडळ अशा संपत्तीसंबंधीची माहिती स्वतः गोळा करील आणि विशिष्ट संपत्ती ही वक्फ-संपत्ती आहे की नाही अथवा एखादा वक्फ हा सुन्नी वक्फ आहे की शिया वक्फ आहे यासंबंधी एखादा प्रश्न उद्भवला तर, मंडळ स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्या प्रश्नाचा निर्णय करू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील कोणत्याही प्रश्नावरील मंडळाचा निर्णय, सक्षम अधिकारितेच्या दिवाणी न्यायालयाने रद्द ठरवला नाही किंवा आपरिवर्तित केला नाही तर अंतिम ठरेल.

**वक्फाची नोंदणी करवून घेण्याची आणि नोंदवहीत विशोधन करण्याची शक्ती.**

२८. मंडळ, मुतवल्लीस वक्फाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्याचा निदेश देऊ शकेल किंवा त्यास वक्फासंबंधी कोणतीही माहिती पुरवण्यास सांगू शकेल किंवा मंडळ स्वतःच वक्फाची नोंदणी करवून घेऊ शकेल किंवा कोणत्याही वेळी वक्फ नोंदवही विशोधित करू शकेल.

**नोंदलेल्या वक्फां-तील बदला-संबंधीची सूचना.**

२९. (१) नोंदलेल्या वक्फाच्या व्यवस्थापनामध्ये मुतवल्लीच्या मृत्युमुळे, किंवा सेवानिवृत्तीमुळे किंवा त्याला काढून टाकल्यामुळे बदल घडून आल्यास, तो बदल मंडळाला नव्याने आलेला मुतवल्ली तत्काळ कळवील, आणि अन्य कोणतीही व्यक्ती कळवू शकेल.

(२) कलम २५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही तपशिलात अन्य काही बदल झाला असेल त्याबाबतीत, मुतवल्ली असा बदल घडून आल्यापासून तीन महिन्यांच्या आत असा बदल मंडळाला कळवील.

**व्यावृत्ती.**

३०. या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादा वक्फ या अधिनियमाच्या प्रारंभा-पूर्वी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार नोंदण्यात आला असेल तर, या अधि-नियमाच्या उपबंधांखाली त्याची नोंदणी करणे आवश्यक ठरणार नाही आणि अशा प्रारंभापूर्वी केलेली कोणतीही नोंदणी या अधिनियमाखालील नोंदणी असल्याचे मानले जाईल.

## प्रकरण ५ वे

### मुतवल्ली आणि वक्फाचे हिशेब

**३१.** वक्फाचा प्रत्येक मुतवल्ली दरवर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळी पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प तयार करून त्यात त्या वित्तीय वर्षाची अंदाजित जमा व खर्च दर्शवील व तो अर्थसंकल्प मंडळाला मान्यतेसाठी सादर करील. अर्थसंकल्प.

**३२.** [1][(१) प्रत्येक मुतवल्ली नियमित हिशेब ठेवील.] वक्फांचे हिशेब सादर करणे.

[2][(२)] कलम २५ मध्ये निर्देशिलेला अर्ज ज्या दिनांकाला केला असेल त्यानंतर लगेच येणाऱ्या १ मे पूर्वी आणि त्यानंतर दरवर्षी १ मे पूर्वी प्रत्येक वक्फाचा मुतवल्ली, ३१ मार्च रोजी संपणाऱ्या बारा महिन्यांच्या कालावधीत किंवा, प्रकरणपरत्वे, उक्त कालावधीच्या जेवढ्या कालखंडापुरते या अधिनियमाचे उपबंध त्या वक्फाला लागू करण्यात आले असतील तेवढ्या कालखंडात वक्फाच्या संबंधात मुतवल्लीला मिळालेल्या व त्याने खर्च केलेल्या सर्व पैशांचे, मंडळ विहित करील अशा नमुन्यात व असा तपशील असलेले परिपूर्ण व खरे हिशेब विवरणपत्र तयार करून ते मंडळाला सादर करील :

परंतु, हिशेबांच्या वर्षअखेरीचा दिनांक मंडळाला स्वविवेकानुसार बदलता येईल.

**३३.** (१) मंडळ नियुक्त करील असा लेखापरीक्षक कलम ३२ खाली मंडळाला सादर करण्यात आलेल्या वक्फांच्या हिशेबांची दरवर्षी किंवा मंडळ ठरवून देईल अशा कालांतरागणिक लेखापरीक्षा व तपासणी करील. वक्फांची लेखापरीक्षा.

(२) लेखापरीक्षक आपला अहवाल मंडळाला सादर करील आणि लेखापरीक्षकाच्या या अहवालात इतर गोष्टींबरोबरच नियमबाह्य, अवैध किंवा अयोग्य खर्चासंबंधीची किंवा हयगयीमुळे अथवा दुर्वर्तनामुळे पैसा वा अन्य संपत्ती यांची वसुली न होणे यासंबंधीची सर्व प्रकरणे आणि जी बाब अहवालात नमूद करणे आवश्यक आहे असे लेखापरीक्षकाला वाटत असेल अशी अन्य कोणतीही बाब तो अहवालात विनिर्दिष्ट करील, तसेच, अशा खर्चास किंवा वसुली न होण्यास लेखापरीक्षकाच्या मते जी व्यक्ती जबाबदार असेल तिचे नावही या अहवालात नमूद केलेले असेल आणि लेखापरीक्षक अशा प्रत्येक प्रकरणात अशा व्यक्तीकडून येणे असलेल्या अशा खर्चाची व नुकसानाची रक्कम किती हे प्रमाणित करील.

(३) वक्फाच्या लेखापरीक्षेचा खर्च वक्फ निधीतून दिला जाईल.

**३४.** मंडळ लेखापरीक्षकाच्या अहवालाची तपासणी करील आणि त्यात उल्लेखिलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी ते कोणत्याही व्यक्तीचे स्पष्टीकरण मागवू शकेल आणि या अहवालाबाबत त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल. मंडळाने लेखापरीक्षकाच्या अहवालावर आदेश काढावयाचे.

**३५.** (१) लेखापरीक्षकाने कलम ३३ खालील आपल्या अहवालात जी रक्कम एखाद्या व्यक्तीकडून येणे म्हणून प्रमाणित केली असून कलम ३४ खाली मंडळाने दिलेल्या आदेशाद्वारे असे प्रमाणपत्र आपरिवर्तित किंवा रद्द करण्यात आले नसेल तर अशी प्रत्येक रक्कम आणि आपरिवर्तित प्रमाणपत्रानुसार येणे असलेली प्रत्येक रक्कम, अशी व्यक्ती मंडळाने काढलेला मागणीहुकूम बजावला गेल्यानंतर साठ दिवसांच्या आत भरील. देय म्हणून प्रमाणित केलेल्या रकमा जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करावयाच्या.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांनुसार असा भरणा न केल्यास ती देय रक्कम, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणेच वसूल केली जाईल.

**३६.** (क) मंडळाचे निदेश अंमलात आणणे ; मुतवल्लींची कर्तव्ये.

(ख) मंडळाला, ते वेळोवेळी मागवील अशी प्रतिवेदने सादर करणे आणि अशी माहिती किंवा तपशील पुरवणे ;

(ग) वक्फ-संपत्ती, त्यासंबंधीचे हिशेब किंवा अभिलेख किंवा विलेख आणि दस्तऐवज यांचे निरीक्षण करण्यास अनुमती देणे;

(घ) सर्व सार्वजनिक देणी चुकती करणे;

(ङ) या अधिनियमाखाली किंवा त्याद्वारे त्यास विधितः आवश्यक केली असेल अशी अन्य कोणतीही कृती करणे,

हे प्रत्येक मुतवल्लीचे कर्तव्य असेल.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम १० अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. उपरोक्त अधिनियमाच्या कलम १० अन्वये कलम ३२ यास त्या कलमाचे पोटकलम (२) असा क्रमांक देण्यात आला.

वक्फांच्या स्थावर संपत्तीचे हस्तांतरण.

[1][३६ क. वक्फनाम्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वक्फाच्या कोणत्याही स्थावर संपत्तीचे—

(एक) विक्री, दान, गहाण किंवा विनिमय; किंवा

(दोन) शेतजमिनीबाबत तीन वर्षांहून अधिक कालावधीचा किंवा बिगरशेतकी जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत एक वर्षाहून अधिक मुदतीचा भाडेपट्टा,

याद्वारे केलेले हस्तांतरण मंडळाच्या पूर्वमंजुरीशिवाय विधिग्राह्य समजले जाणार नाही.

कलम ३६ क चे व्यतिक्रमण करून हस्तांतरित केलेली वक्फ-संपत्ती परत मिळवणे.

३६ ख. (१) मंडळाने विहित असेल अशा रीतीने चौकशी केल्यानंतर, कलम ६ खाली ठेवण्यात आलेल्या वक्फ नोंदवहीमध्ये नोंदलेल्या वक्फाची कोणतीही स्थावर संपत्ती कलम ३६ क च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून मंडळाची पूर्वमंजुरी न घेता हस्तांतरित केली असल्याची मंडळाची खात्री झाली तर, मंडळ ती संपत्ती ज्या जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारितेमध्ये असेल त्याच्याकडे, मंडळाला या संपत्तीचा कब्जा मिळवून देण्याबाबत मागणीहुकूम धाडू शकेल.

(२) पोट-कलम (१) खालील मागणीहुकूम मिळाल्यावर जिल्हाधिकारी जिच्याकडे त्या संपत्तीचा कब्जा असेल त्या व्यक्तीला आदेश बजावल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत हा कब्जा मंडळाकडे सुपूर्द करावा असे निदेशित करणारा आदेश काढील.

(३) पोट-कलम (२) खाली देण्यात आलेला प्रत्येक आदेश—

(क) ज्या व्यक्तीला उद्देशून तो काढलेला असेल तिला ते आदेशपत्र देऊन किंवा देऊ करून किंवा डाकेने पाठवून; किंवा

(ख) जर ती व्यक्ती सापडणे शक्य नसेल तर त्या व्यक्तीचे ज्ञात असे लगतपूर्वीचे जे राहण्याचे किंवा कामधंद्याचे ठिकाण असेल त्या ठिकाणी एखाद्या ठळक जागी तो आदेश चिकटवून किंवा तो आदेश तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषाकडे किंवा नोकराकडे देऊन किंवा देऊ करून किंवा तो आदेश ज्या संपत्तीशी संबंधित आहे त्या संपत्तीच्या ठिकाणी एखाद्या ठळक जागी चिकटवण्याची व्यवस्था करून बजावण्यात येईल :

परंतु, आदेश जिच्यावर बजावावयाचा आहे ती जर अज्ञान व्यक्ती असेल तर, तो आदेश तिचा पालक किंवा तिच्या कुटुंबातील प्रौढ पुरुष किंवा नोकर यांच्यावर बजावण्यात आला म्हणजे तो आदेश अज्ञान व्यक्तीवर बजावण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) खालील जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला तो आदेश बजावल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, ही संपत्ती ज्याच्या अधिकारितेत असेल त्या न्यायालयाकडे अपील करता येईल आणि अशा अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण** :—या पोट-कलमामध्ये "जिल्हा न्यायालय" याचा अर्थ ज्या कोणत्याही क्षेत्रासाठी नगर दिवाणी न्यायालय असेल तेथे ते न्यायालय आणि इतर कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत, मूळ अधिकारिता असलेले मुख्य दिवाणी न्यायालय असा आहे.

(५) जेव्हा पोट-कलम (२) खाली दिलेल्या आदेशाचे अनुपालन झालेले नसेल आणि अशा आदेशाविरुद्ध अपील करण्याची मुदत अपील दाखल न होता संपेल किंवा त्या मुदतीत दाखल केलेले अपील फेटाळले गेले असेल तर, ज्या संपत्तीबाबत हा आदेश देण्यात आला होता त्या संपत्तीचा कब्जा जिल्हाधिकारी त्यासाठी आवश्यक तर बळाचा वापर करूनही मिळवील आणि तो मंडळाकडे सुपूर्द करील.

(६) जिल्हाधिकारी या कलमाखालील आपले कार्याधिकार वापरत असताना, राज्य शासन याबाबत करील असे नियम त्याला मार्गदर्शक होतील.]

वक्फ-संपत्तीच्या उत्पन्नातून विवक्षित खर्च देण्यास मुतवल्ली हक्कदार.

३७. वक्फनाम्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मुतवल्लीला कलम २५ खालील कोणताही तपशील, दस्तऐवज किंवा प्रती किंवा कलम ३२ खालील कोणतेही हिशेब किंवा मंडळाला आवश्यक असलेली कोणतीही माहिती किंवा दस्तऐवज सादर करता यावेत यासाठी किंवा मंडळाने दिलेल्या कोणत्याही निदेशाचे त्याला अनुपालन करता यावे यासाठी त्याला योग्यपणे करावा लागणारा खर्च वक्फ-संपत्तीच्या उत्पन्नामधून भागवता येईल.

मुतवल्लीने देणे रकमा देण्यात कसूर केल्यास त्या चुकत्या करण्याची मंडळाची शक्ती.

३८. (१) जेव्हा एखादा मुतवल्ली शासनास किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास देय असलेला कोणताही महसूल, उपकर, पट्टी किंवा कर भरण्याचे नाकारील किंवा भरणार नाही तेव्हा, मंडळ वक्फ निधीतून ही देय रक्कम चुकती करू शकेल आणि अशा रीतीने भरणा केलेली रक्कम ते वक्फ संपत्तीतून वसूल करू शकेल, तसेच अशा भरलेल्या रकमेवर १२ टक्क्यांहून अधिक नाही इतक्या प्रमाणात नुकसानभरपाईसुद्धा वसूल करू शकेल.

(२) पोट-कलम (१) खाली देय असलेली कोणतीही रक्कम संबंधित मुतवल्लीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्रावर जमीन-महसुलाच्या थकबाकीच्या पद्धतीप्रमाणेच वसूल केली जाईल.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४,—कलम ११ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३९. शासनास किंवा स्थानिक प्राधिकरणास देय असलेले भाडे आणि महसूल, उपकर, पट्टी आणि कर यांचा भरणा करण्यासाठी, वक्फ-संपत्तीच्या दुरुस्तीच्या कामाच्या खर्चासाठी आणि वक्फ-संपत्तीच्या परिरक्षणासाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ वक्फाच्या उत्पन्नातून मंडळ त्यास योग्य वाटेल अशा पद्धतीने एक राखीव निधी निर्माण करण्याचा व तो राखण्याचा निदेश देऊ शकेल. राखीव निधी निर्माण करणे.

४०. तसे करणे आवश्यक आहे अशी स्वतःची खात्री झाली तर, मंडळ मुतवल्लीने या अधिनियमाखाली करावयाच्या कोणत्याही कामाची मुदत वाढवून देऊ शकेल. मुदतवाढ.

४१. (१) जर एखाद्या मुतवल्लीने— दंड.

(क) वक्फाच्या नोंदणीसाठी अर्ज केला नाही ;

(ख) या अधिनियमाखाली आवश्यक अशा तपशिलाची विवरणपत्रे किंवा हिशेब किंवा प्रतिवेदने सादर केली नाहीत ;

(ग) मंडळाला आवश्यक असलेली माहिती किंवा तपशील दिला नाही ;

(घ) वक्फ-संपत्ती किंवा तिचे हिशेब, अभिलेख किंवा विलेख आणि त्यासंबंधीचे दस्तऐवज यांची तपासणी करू दिली नाही ;

(ङ) मंडळाने किंवा न्यायालयाने तसा आदेश दिल्यास एखाद्या वक्फ-संपत्तीचा कब्जा दिला नाही ;

(च) मंडळाच्या निदेशांचे अनुपालन केले नाही ;

१ *　*　*　*　*

(ज) कोणतेही सार्वजनिक देणे फेडले नाही ; किंवा

(झ) त्याने या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली जी कोणतीही कृती करणे विधितः आवश्यक आहे ती त्याने केली नाही ;

आणि आपणांकडून तसे न होण्यास सयुक्तिक कारण होते याबद्दल त्याने न्यायालयाची खात्री करून दिली नाही तर, तो एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) मंडळाने, किंवा मंडळाने याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने तशी तक्रार केली असल्याशिवाय कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याची दखल घेणार नाही.

(३) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्याहून कमी दर्जा असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

४२. जेव्हा वक्फाच्या मुतवल्लीचे पद रिक्त असेल आणि वक्फनाम्याच्या अटींनुसार नियुक्ती करण्यासारखी एकही व्यक्ती उपलब्ध नसेल किंवा एखाद्या व्यक्तीच्या मुतवल्ली म्हणून काम करण्याच्या हक्काबाबत वाद असेल तेव्हा, मंडळ, त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत आणि अशा अटींवर कोणत्याही व्यक्तीची मुतवल्ली म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करू शकेल. **विवक्षित प्रकरणी मुतवल्लीची नियुक्ती करण्याची शक्ती.**

४३. (१) इतर कोणत्याही कायद्यात किंवा वक्फनाम्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जर— मुतवल्लीना काढून टाकणे.

(क) मुतवल्ली कलम ४१ खालील शिक्षापात्र अपराधाबद्दल एकाहून अधिक वेळा दोषी ठरवण्यात आला असेल तर; किंवा

२[ (ख) तो फौजदारी स्वरूपाच्या न्यासभंगाच्या अपराधाबद्दल किंवा नैतिक अधःपतन अनुस्यूत असलेल्या अन्य कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आला असेल तर; किंवा

(ग) तो वक्फ-संपत्तीचा अपहार किंवा अनुचित व्यवहार करीत असेल तर; किंवा

(घ) तो विकल मनाचा असेल किंवा ज्यामुळे तो मुतवल्लीची कार्ये पार पाडण्यास व कर्तव्ये बजावण्यास अपात्र ठरेल असा इतर कोणताही मानसिक किंवा शारीरिक दोष अथवा दुर्बलता त्याच्यामध्ये असेल तर ; किंवा

(ङ) कलम ४६ खाली त्याने द्यावयाचे अंशदान भरण्याच्या कामी त्याने लागोपाठ दोन वर्षे वाजवी सबबीशिवाय कसूर केली असेल तर,]

अशा मुतवल्लीला मंडळ त्याच्या पदावरून काढून टाकू शकेल.

(२) जेव्हा मंडळाने किंवा ३[न्यायालयाहून अन्य अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने] वक्फ-संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी व प्रशासनासाठी मुतवल्ली म्हणून काम करण्यासाठी एखादी समिती नियुक्त केली असेल आणि मंडळाच्या मते अशी समिती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली तिच्यावर

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम १२ अन्वये खंड (छ) वगळण्यात आला.

२. किता—कलम १३ द्वारे खंड (ख) ऐवजी घातले.

३. किता—कलम १३ द्वारे घातले.

सोपवलेले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ असेल किंवा तिने त्याकामी कसूर करण्याचा हेका चालवला असेल अथवा तिने आपल्या शक्तीचा अतिक्रम केला असेल किंवा दुरुपयोग केला असेल तर, समितीला निष्प्रभावी करून मंडळाला वक्फ-संपत्तीचा मुतवल्ली म्हणून काम करण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीची किंवा समितीची नियुक्ती करता येईल.

(३) शंकानिरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, एखाद्या व्यक्तीला मुतवल्लीच्या पदावरून काढून टाकल्यामुळे वक्फ-संपत्तीच्या संबंधात हिताधिकारी म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने त्याला काही व्यक्तिगत अधिकार असल्यास किंवा सज्जादनशीन म्हणून त्याला काही अधिकार असल्यास त्या अधिकारांना बाध येणार नाही.

(४) मंडळाने एखाद्या बाबतीत विहित रीतीने चौकशी करून मंडळाच्या सदस्यांपैकी तीन-चतुर्थांशाहून कमी नसेल एवढ्या बहुमताने निर्णय घेतल्याशिवाय मंडळ पोट-कलम (१) किंवा (२) खाली कोणतीही कारवाई करणार नाही.

[१][ (४क) पोट-कलम (१) च्या खंड (ग्) ते (ङ्) पर्यंतच्या कोणत्याही खंडाखाली किंवा पोट-कलम (२) खाली काढलेल्या एखाद्या आदेशामुळे नाराज झालेल्या मुतवल्लीला तो आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत राज्य शासनाकडे त्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल आणि राज्य शासनाचा अशा अपीलावरील निर्णय अंतिम असेल आणि तो कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही. ]

(५) जेव्हा पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खाली मुतवल्लीला त्याच्या पदावरून काढून टाकण्यात आले असेल तेव्हा, मंडळ मुतवल्लीला आदेशाद्वारे वक्फ-संपत्तीचा कब्जा मंडळाला किंवा याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या त्याच्या अधिकाऱ्याला किंवा वक्फ-संपत्तीचा मुतवल्ली म्हणून काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा समितीला देण्याचा निदेश देऊ शकेल, आणि मंडळाचा आदेश हा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा असल्याचे समजण्यात येईल आणि दिवाणी न्यायालय जणू काही त्यानेच तो हुकूमनामा काढलेला असावा अशा प्रकारे तो अंमलात आणील.

[१][ (६) या कलमाखाली पदावरून काढून टाकण्यात आलेला वक्फाचा मुतवल्ली, अशा रीतीने काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत त्या वक्फाचा मुतवल्ली म्हणून नियुक्त केला जाण्यास पात्र असणार नाही. ]

**मंडळाने विवक्षित वक्फांचे प्रत्यक्ष व्यवस्थापन हाती घ्यावयाचे.**

[२][**४३क.** (१) जेव्हा कलम ४२ खाली किंवा कलम ४३ च्या पोट-कलम (२) खाली वक्फाचा मुतवल्ली म्हणून नियुक्त करण्यासारखी एकही योग्य व्यक्ती उपलब्ध नसेल तेव्हा मंडळ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा व एकूण पाच वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीपर्यंत वक्फाचे प्रत्यक्ष व्यवस्थापन हाती घेईल.

(२) कलम ३३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, 'सनदी लेखाकार अधिनियम १९४९' (१९४९ चा ३८) याच्या अर्थानुसार असलेल्या व्यवसायकारी सनदी लेखाकारांमधून मंडळ नियुक्त करील असा लेखापरीक्षक मंडळाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असलेल्या प्रत्येक वक्फाची दरवर्षी लेखापरीक्षा करील. ]

**चौकशीसाठी अर्ज.**

४४. वक्फामध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला वक्फाच्या प्रशासनाशी संबंधित अशी चौकशी सुरू करण्यासाठी, मंडळाकडे पुष्टीदाखल शपथपत्र जोडलेला अर्ज करता येईल आणि वक्फाच्या कारभाराचे गैरव्यवस्थापन चालू आहे असे समजण्यास वाजवी कारणे आहेत याबद्दल मंडळाची खात्री झाल्यास मंडळ त्यावर योग्य वाटेल अशी कारवाई करील.

**मंडळाकडून चौकशी.**

४५. [३][ (१) मंडळ, कलम ४४ खाली आलेल्या अर्जावरून किंवा स्वत: होऊन वक्फासंबंधीच्या कोणत्याही बाबतीत,—

(क्) विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करू शकेल; किंवा

(ख्) याबाबत चौकशी करण्यास कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करू शकेल,

आणि आपणांस योग्य वाटेल अशी कारवाई करू शकेल. ]

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ मंडळाला किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली साक्षीदाराला उपस्थित राहण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्यासंबंधी दिवाणी न्यायालयाला आहेत त्याच शक्ती असतील.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम १३ द्वारे घातले.

२. कित्ता—कलम १४ द्वारे घातले.

३. कित्ता—कलम १५ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी घातले.

## प्रकरण ६ वे

### मंडळाची वित्तव्यवस्था

मंडळाला प्रदेय असणारी वार्षिक अंशदाने.

४६. (१) प्रत्येक वक्फाचा मुतवल्ली राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधीनतेने मंडळ वेळोवेळी ठरवील असे, [२][वक्फाला राज्यामध्ये मिळणाऱ्या निव्वळ वार्षिक उत्पन्नाच्या] [१][सहा] टक्क्यांहून अधिक नाही इतके अंशदान मंडळास देईल :

परंतु, ज्या वक्फाचे निव्वळ वार्षिक उत्पन्न शंभर रुपयांहून अधिक नसेल त्याच्या मुतवल्लीला असे अंशदान द्यावे लागणार नाही.

(२) मंडळाला, कोणत्याही विशिष्ट वक्फाच्या बाबतीत असे अंशदान त्याला वाटेल तितक्या मुदतीपुरते कमी करता येईल किंवा माफ करता येईल.

(३) वक्फाच्या मुतवल्लीला, पोट-कलम (१) खाली त्याच्याकडून प्रदेय असलेली अंशदाने, वक्फापासून आर्थिक किंवा अन्य महत्त्वाचे लाभ मिळण्यास हक्कदार असलेल्या निरनिराळ्या व्यक्तींकडून वसूल करता येतील, पण अशा व्यक्तींपैकी कोणाहीकडून वसूल करण्यायोग्य असलेली रक्कम ही, अशा व्यक्तीला मिळण्यायोग्य असलेल्या लाभांच्या मूल्यांचे वक्फाच्या संपूर्ण निव्वळ वार्षिक उत्पन्नाशी जेवढे प्रमाण असेल तेवढ्याच प्रमाणात एकूण प्रदेय अंशदानाशी प्रमाणशीर असलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु पोट-कलम (१) खालील अंशदाना व्यतिरिक्त या अधिनियमाखालील देणे म्हणून प्रदेय असलेल्या रकमेपेक्षा अधिक आणि वक्फनाम्याखाली प्रदेय असलेल्या रकमेपेक्षा अधिक असे वक्फाचे काही उत्पन्न असल्यास अशा उत्पन्नामधून अंशदान भागवण्यात येईल.

(४) वक्फाच्या संबंधात पोट-कलम (१) खाली प्रदेय असलेले अंशदान म्हणजे वक्फाच्या उत्पन्नावरील पहिला प्रभार असेल---मात्र शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देय असलेल्या कोणत्याही रकमा किंवा वक्फ-संपत्तीवरील किंवा तिच्या उत्पन्नावरील अन्य कोणताही सांविधिक प्रभार हे आधी चुकते केले पाहिजेत--आणि ते अंशदान संबंधित मुतवल्लीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्रान्वये जमीन-महसुलाच्या थकबाकीच्याच पद्धतीप्रमाणे वसुलीयोग्य राहील.

(५) जर मुतवल्लीने वक्फाचे उत्पन्न वसूल केले आणि अंशदान भरण्यास नकार दिला किंवा भरले नाही तर, अशा अंशदानास तो व्यक्तिशःसुद्धा दायी होईल व ते खुद्द त्याच्याकडून किंवा त्याच्या संपत्तीतून पूर्वोक्त पद्धतीनुसार वसूल करता येईल.

मंडळाची कर्ज काढण्याची शक्ती.

४७. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने मंडळाला राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे तशी रक्कम आणि तशा अटींवर व शर्तींवर कर्जाऊ घेता येईल आणि कर्जाऊ घेतलेली रक्कम कर्जाच्या अटी व शर्ती यांनुसार त्यासंबंधात असलेले कोणतेही व्याज किंवा खर्च यांसह परत करावी लागेल.

वक्फ निधि.

४८. [३][(१) या अधिनियमाखाली मंडळाला मिळालेला किंवा मंडळाने वसूल केलेला सर्व पैसा आणि देणग्या, धर्मदाने किंवा अनुदाने म्हणून मंडळाला मिळालेला अन्य सर्व पैसा यांचा मिळून 'वक्फ निधि' म्हणून एक निधी तयार होईल.

(१क) देणग्या, धर्मदाने किंवा अनुदाने म्हणून मंडळाला मिळालेला सर्व पैसा वेगळ्या उपशीर्षाखाली जमा करण्यात येऊन त्यात त्याचा हिशेब दाखवण्यात येईल.]

(२) राज्य शासन याबाबतीत करील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, वक्फ निधी मंडळाच्या नियंत्रणाखाली असेल.

(३) वक्फ निधी पुढील गोष्टींसाठी उपयोजित करण्यात येईल,---

(क) कलम ४७ खाली काढलेल्या कोणत्याही कर्जाची परतफेड आणि त्यावरील व्याजाचा भरणा;

(ख) वक्फ निधी आणि वक्फ हिशेब यांच्या लेखापरीक्षेचा खर्च देणे;

(ग) मंडळाचा सचिव आणि कर्मचारीवर्ग यांचे वेतन आणि भत्ते देणे;

(घ) मंडळाचा अध्यक्ष, सदस्य, सचिव आणि कर्मचारीवर्ग यांना प्रवास भत्ते देणे;

(ङ) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी मंडळाने केलेला खर्च देणे.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम १६ द्वारे "पाच" या शब्दाऐवजी घातले.

२. १९६९ चा अधिनियम क्रमांक-३८-कलम ९ द्वारे, "त्या वक्फाची जितकी संपत्ती त्या राज्यात असेल तिच्या निव्वळ वार्षिक उत्पन्नाच्या" या मजकुराऐवजी (भूतलक्षी परिणामासह) घातले.

३. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम १७ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी घातले.

(४) पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेला खर्च भागवल्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिली असेल तर, मंडळाला अशा शिल्लक रकमेचा कोणताही भाग, वक्फ-संपत्ती जतन करण्यासाठी आणि तिचे संरक्षण करण्यासाठी किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता येईल.

मंडळाचा अर्थसंकल्प.

४९. मंडळ, दर वर्षी विहित असेल अशा नमुन्यात व अशा वेळी पुढील वित्तीय वर्षासाठी, त्या वित्तीय वर्षातील अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील.

मंडळाचे हिशेब.

५०. मंडळ विहित असेल अशा नमुन्यात आणि अशा पद्धतीने हिशेब-पुस्तके आणि त्याच्या हिशेबाच्या संबंधातील इतर पुस्तके ठेववील.

मंडळाच्या हिशेबांची लेखापरीक्षा.

५१. (१) राज्य शासन नियुक्त करील असे लेखापरीक्षक दरवर्षी मंडळाच्या हिशेबांची लेखा-परीक्षा व तपासणी करतील.

(२) लेखापरीक्षक आपला अहवाल राज्य शासनाला सादर करील आणि या अहवालात इतर गोष्टींबरोबरच नियमबाह्य, अवैध किंवा अयोग्य खर्च किंवा निष्काळजीपणामुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे पैसे किंवा अन्य संपत्ती हस्तगत न होणे याबाबतची प्रकरणे आणि जी बाब अहवालात नमूद करणे आवश्यक आहे असे लेखापरीक्षकाला वाटत असेल अशी अन्य कोणतीही बाब विनिर्दिष्ट करील; आणि अशा खर्चाला किंवा कसुरीला जी व्यक्ती जबाबदार आहे असे लेखापरीक्षकाचे मत असेल त्या व्यक्तीचे नावही या अहवालात असेल आणि अशा प्रत्येक प्रकरणात लेखापरीक्षक अशा खर्चाची किंवा नुकसानीची रक्कम ही त्या व्यक्तीकडून येणे रक्कम म्हणून प्रमाणित करील.

(३) लेखापरीक्षेचा खर्च वक्फ निधीतून भागवला जाईल.

लेखापरीक्षकाच्या अहवालावरून राज्य शासनाने आदेश काढावयाचा.

५२. राज्य शासन, लेखापरीक्षकाच्या अहवालाची तपासणी करील आणि त्यात नमूद केलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीचे स्पष्टीकरण मागवील आणि अहवालावरून त्याला योग्य वाटतील असे आदेश काढील.

येणे म्हणून प्रमाणित केलेल्या रकमा जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य.

५३. (१) लेखापरीक्षकाने कलम ५१ खालील आपल्या अहवालात एखाद्या व्यक्तीकडून एखादी रक्कम येणे असल्याचे प्रमाणित केले असता, कलम ५२ खाली राज्य शासनाने दिलेल्या आदेशाद्वारे असे प्रमाणपत्र आपरिवर्तित किंवा रद्द झाले नसेल तर, अशी प्रत्येक रक्कम आणि आपरिवर्तित प्रमाणपत्रानुसार येणे असलेली प्रत्येक रक्कम राज्य शासनाने त्याकरिता मागणीपत्राची बजावणी केल्यापासून साठ दिवसांच्या आत अशा व्यक्तीला भरावी लागेल.

(२) जर असा भरणा पोटकलम (१) च्या उपबंधांनुसार केला नसेल तर, प्रदेय रक्कम ही मंडळाने संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्रावरून जमीन-महसुलाच्या थकबाकीच्याच पद्धतीप्रमाणे वसूल करता येईल.

५४. [शासनाचे कोणतेही वित्तीय दायित्व नसावयाचे].

'वक्फ (विशोधन) अधिनियम, १९६४' (१९६४ चा ३४)--कलम १८ द्वारे निरसित.

## प्रकरण ७ वे

### न्यायिक कार्यवाही

'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' याच्या कलम ९२ खाली दावा मांडणे.

[1][५५. (१) मंडळाला, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याच्या कलम ९२ मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणताही अनुतोष मिळवण्यासाठी कोणत्याही वक्फाशी संबंधित असलेला दावा, त्या कलमात विरुद्ध असे काहीही असले तरी त्यात निर्देशिलेल्या संमतीशिवाय मांडता येईल.

(२) मंडळाच्या लेखी संमतीशिवाय कोणतीही व्यक्ती किंवा मंडळाहून अन्य कोणतेही प्राधिकरण 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याच्या कलम ९२ मध्ये निर्देशिलेले अनुतोष मिळवण्या-करिता वक्फाशी संबंधित असलेला कोणताही दावा मांडणार नाही आणि असा दावा मांडण्याकरिता, त्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, त्यात निर्देशिलेली संमती घेणे आवश्यक असणार नाही :

परंतु, मंडळाविरुद्ध असलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात या पोटकलमाखालील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

मंडळाविरुद्ध असलेल्या पक्षांकडून दाव्यांची नोटीस.

५६. मंडळाने जी कोणतीही कृती या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या पालनार्थ केली असल्याचे दिसते तिच्या बाबतीत, वादकारण, वादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण आणि त्याने मागणी केलेला अनुतोष नमूद केलेली लेखी नोटीस मंडळाच्या कार्यालयाकडे सुपूर्द केल्याच्या किंवा तेथे ती ठेवण्यात आल्याच्या लगतनंतरचे दोन महिने संपेपर्यंत मंडळाविरुद्ध कोणताही दावा मांडला जाणार नाही; आणि अशी नोटीस सुपूर्द करण्यात आली असल्याचे किंवा ठेवण्यात आली असल्याचे निवेदन अशा वादपत्रात अंतर्भूत करण्यात येईल.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम १९ द्वारे कलम ५५ ऐवजी घातले.

५७. (१) वक्फ-संपत्तीवरील हक्काच्या संबंधातील किंवा मुतवल्लीच्या अधिकारासंबंधातील प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, न्यायालय असा दावा किंवा कार्यवाही मांडणाऱ्या पक्षकाराच्या खर्चाने मंडळाला नोटीस काढील. न्यायालयांकडून दावे इत्यादींची नोटीस.

(२) जेव्हा केव्हा एखादी वक्फ-संपत्ती दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या ओघात अथवा शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देय असलेला कोणताही महसूल, उपकर, पट्टा किंवा कर यांच्या वसुलीकरिता विकावयाची म्हणून अधिसूचित करण्यात येईल तेव्हा, ज्याच्या आदेशाखाली ती विक्री अधिसूचित करण्यात आली असेल असे न्यायालय, जिल्हाधिकारी किंवा अशी अन्य कोणतीही व्यक्ती मंडळाला नोटीस देईल.

(३) पोटकलम (१) खाली नोटीस दिलेली नसेल तेव्हा, दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये करण्यात आलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, मंडळाला अशा दाव्याचे किंवा कार्यवाहीचे वृत्त कळल्यापासून एक महिन्याच्या आत, मंडळाने त्याबाबत न्यायालयाकडे अर्ज केला असेल तर, शून्य असल्याचे घोषित करण्यात येईल.

(४) पोटकलम (२) खाली नोटीस दिलेली नसेल तेव्हा, जर आपणास विक्रीचे वृत्त कळल्यापासून एक महिन्याच्या आत मंडळाने ज्याच्या आदेशाखाली विक्री करण्यात आली त्या न्यायालयाकडे किंवा अन्य प्राधिकरणाकडे त्याबाबत अर्ज केला तर, विक्री शून्य असल्याचे घोषित करण्यात येईल.

५८. (१) 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) याखाली कार्यवाही चालू असताना, संपादनाखालील कोणतीही संपत्ती ही वक्फ-संपत्ती असल्याचे, निवाडा देण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याला दिसून आले तर जिल्हाधिकारी अशा संपादनाची नोटीस मंडळावर बजावील आणि पुढील कार्यवाही मंडळाला अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी कार्यवाहीतील पक्षकार म्हणून हजर होणे किंवा आपली बाजू मांडणे शक्य व्हावे यासाठी तहकूब करण्यात येईल. 'भूमिसंपादन अधिनियम, १८९४' खालील कार्यवाही.

(२) जेव्हा मंडळाला, एखादी संपादनाधीन संपत्ती ही वक्फ-संपत्ती आहे असे समजण्यास कारण असेल तेव्हा, त्याला निवाडा दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी कार्यवाहीतील पक्षकार म्हणून हजर राहून आपली बाजू मांडता येईल.

(३) जेव्हा पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) च्या उपबंधांखाली मंडळ हजर झाले असेल तेव्हा, मंडळाला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय, 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) याच्या कलम ३१ किंवा कलम ३२ खाली कोणताही आदेश काढला जाणार नाही.

(४) मंडळास आपली बाजू मांडण्याची संधी न देता, 'भूमिसंपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) याच्या कलम ३१ किंवा ३२ खाली काढलेला कोणताही आदेश मंडळाने असा आदेश संमत झाल्याचे त्याला माहीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत, ज्या प्राधिकरणाने तो आदेश काढला त्याच्याकडे याबाबतीत अर्ज केल्यास, शून्य असल्याचे घोषित करण्यात येईल.

५९. वक्फाच्या किंवा कोणत्याही वक्फ-संपत्तीच्या संबंधात वक्फाच्या बाबतीत तिऱ्हाईत असलेल्या व्यक्तीकडून किंवा अशा व्यक्तीविरुद्ध किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून किंवा व्यक्तीविरुद्ध लावण्यात आलेल्या एखाद्या दाव्यात किंवा कार्यवाहीत, त्या दाव्याचा किंवा कार्यवाहीचा एक पक्षकार म्हणून मंडळाला हजर राहून आपली बाजू मांडता येईल. मंडळाने अर्ज केल्यावर त्याला वक्फाच्या संबंधातील दाव्यात किंवा कार्यवाहीत पक्षकार करावयाचे.

६०. वक्फ-संपत्तीवरील हक्क किंवा मुतवल्लीचे अधिकार यासंबंधात वक्फाच्या मुतवल्लीने किंवा त्याच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत मंडळाच्या परवानगीशिवाय तडजोड करता येणार नाही. मुतवल्लींनी किंवा मुतवल्लींविरुद्ध केलेल्या दाव्याबाबत तडजोडीस आडकाठी.

६१. (१) एखादा मुतवल्ली पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय कृत्य म्हणून मुस्लिम कायद्याला मान्य आहे असे कोणतेही कृत्य पार पाडण्याच्या आबंधनास अधीन असून, असे कृत्य पार पाडण्यास तो चुकला तर, ते कृत्य पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम मुतवल्लीने मंडळास किंवा मंडळाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस देण्याचे निदेशित करणारा आदेश दिला जावा यासाठी मंडळाला न्यायालयाकडे अर्ज करता येईल. मुतवल्लीने आपली कर्तव्ये पार पाडली नसतील तर, त्याबाबतीत न्यायालयाकडे अर्ज करण्याची शक्ती.

(२) जेव्हा एखादा मुतवल्ली, वक्फाखाली त्याला नेमून देण्यात आलेली अन्य कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याच्या आबंधनास अधीन असून अशी कर्तव्ये पार पाडण्यास तो हेतुपुर:सर चुकेल तर, मंडळाला किंवा वक्फामध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि न्यायालय, स्वत:ला योग्य वाटेल असा आदेश त्यावर काढू शकेल.

## प्रकरण ८ वे

### संकीर्ण

**केंद्र शासनाकडून निदेश.**

६२. [1][(१) मंडळाने अनुसरावयाच्या धोरणाविषयीच्या प्रश्नांवर केंद्र शासन त्यास योग्य वाटेल असे निदेश देईल आणि केंद्र शासनास, असे निदेश देण्यासाठी कोणत्याही मंडळाकडून संबंधित राज्य शासनामार्फत कोणताही नियतकालिक किंवा अन्य अहवाल किंवा माहिती मागवता येईल.]

(२) मंडळाला, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याचे कामी पोटकलम (१) खाली दिलेले निदेश मार्गदर्शक होतील.

**राज्य शासनाकडून निदेश.**

६३. धोरणविषयक प्रश्नांवर कलम ६२ खाली दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीनतेने, राज्य शासन, त्यास योग्य वाटतील असे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश वेळोवेळी देऊ शकेल आणि आपली कार्ये पार पाडताना, मंडळ अशा कोणत्याही निदेशांचे अनुपालन करील.

**मंडळ निष्प्रभावी करण्याची शक्ती.**

६४. (१) मंडळ या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली सोपवण्यात आलेले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ आहे किंवा त्याने ते पार पाडण्यात कसूर करण्याचा हेका चालवला आहे, किंवा आपल्या शक्तींचा अतिक्रम किंवा दुरुपयोग केला आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या कालावधीपर्यंत मंडळास निष्प्रभावी करू शकेल :

परंतु, या पोटकलमाखाली अधिसूचना काढण्यापूर्वी, मंडळास का निष्प्रभावी केले जाऊ नयेय ाची कारणे दाखविण्यासाठी राज्य शासन मंडळाला वाजवी मुदत देईल आणि मंडळाची काही स्पष्टीकरणे आणि आक्षेप असल्यास, त्यावर विचार करील.

(२) मंडळास निष्प्रभावी करणारी पोटकलम (१) खालील अधिसूचना प्रकाशित झाल्यावर,—

(क) मंडळाचे सर्व सदस्य निष्प्रभावनाच्या दिनांकी आणि तेव्हापासून सदस्यपदावरून मुक्त होतील ;

(ख) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार किंवा त्यांखाली मंडळाने किंवा मंडळाच्या वतीने शक्ती वापरावयाच्या किंवा कर्तव्ये पार पाडावयाची असतील तेव्हा, निष्प्रभावनाच्या कालावधीत राज्य शासन निदेशित करील अशा व्यक्तीकडून किंवा अशा व्यक्तींकडून त्या सर्व शक्ती वापरल्या जातील किंवा ती सर्व कर्तव्ये पार पाडली जातील; आणि

(ग) मंडळाच्या ठायी निहित असलेली सर्व संपत्ती निष्प्रभावनाच्या कालावधीमध्ये राज्य शासनाच्या ठायी निहित होईल.

(३) पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावनाचा कालावधी संपल्यानंतर, राज्य शासनाला :—

(क) त्यास आवश्यक वाटेल इतक्या आणखी कालावधीकरता निष्प्रभावनाचा कालावधी वाढवता येईल; किंवा

(ख) कलम १० आणि कलम ११ मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने मंडळाची पुनर्घटना करता येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

६५. मंडळाने किंवा आयुक्ताने किंवा या अधिनियमाखाली रीतसर नियुक्त झालेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत त्याच्याविरुद्ध कोणताही दावा अथवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**आयुक्त, लेखापरीक्षक इत्यादींना लोकसेवक मानावयाचे.**

६६. आयुक्त, मंडळाचा प्रत्येक लेखापरीक्षक, प्रत्येक अधिकारी व कर्मचारी आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेल्या नियमांद्वारे किंवा दिलेल्या आदेशांद्वारे नेमून देण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी रीतसर नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**विवक्षित मंडळांच्या पुनर्रचनेसाठी विशेष उपबंध.**

[2][६६क. (१) 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) याखालील राज्य-पुनर्रचनेमुळे १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी मंडळ ज्या राज्याच्या संबंधात कार्य करीत होते ते संपूर्ण राज्य किंवा त्याचा कोणताही भाग, त्या दिनांकी दुसऱ्या राज्याकडे हस्तांतरित करण्यात आला असून अशा हस्तांतरणामुळे राज्याच्या ज्या कोणत्याही भागात मंडळ कार्य करीत असेल तेथील मंडळ विसर्जित करण्यात यावे किंवा त्या संपूर्ण राज्यासाठी किंवा त्या राज्याच्या कोणत्याही भागासाठी आंतर-

---

१. १९६९ चा अधिनियम क्रमांक ३४—कलम २० द्वारे पोटकलम (१) एवजी घातले.
२. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३०—कलम ४ द्वारे घातले.

राज्य मंडळ म्हणून त्याची पुनर्घटना आणि पुनर्रचना करावी असे राज्य शासनास वाटत असेल तेव्हा, राज्य शासन, अशा विसर्जनासाठी किंवा, प्रकरणपरत्वे, अशा पुनर्घटनेसाठी आणि पुनर्रचनेसाठी, तसेच मंडळाच्या कर्मचाऱ्यांची बदली किंवा पुनःसेवायोजन यांसाठी त्या मंडळाची दुसऱ्या मंडळाला किंवा राज्य शासनाला हस्तांतरित करावयाची मत्ता, अधिकार आणि दायित्वे यांसंबंधातील प्रस्तावांसह एक योजना तयार करून, ती योजना केंद्र शासनाकडे पाठवील.

(२) पोटकलम (१) खाली पाठवलेली योजना मिळाल्यावर, केंद्र शासन संबंधित राज्य शासनाचा विचार घेऊन फेरबदलांसह किंवा त्यांविना त्या योजनेस मान्यता देईल आणि आपणांस योग्य वाटेल असा आदेश काढून त्याद्वारे अशातऱ्हेने मान्य केलेली योजना अंमलात आणील.

(३) पोटकलम (२) खालील आदेशात पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींचा उपबंध करता येईल, त्या अशा,—

(क) मंडळाचे विसर्जन;

(ख) मंडळाची पुनर्घटना आणि आवश्यक तेथे नवीन मंडळाच्या स्थापनेसुद्धा पुनर्रचना;

(ग) ज्या क्षेत्राच्या बाबतीत पुनर्घटित मंडळाला किंवा नवीन मंडळाला कार्याधिकार असेल व ते कार्य करील असे क्षेत्र;

(घ) एका मंडळाची मत्ता, हक्क आणि दायित्वे (त्याने केलेल्या कोणत्याही संविदेखालील अधिकार आणि दायित्वे यांसुद्धा) यांचे पूर्णतः किंवा अंशतः अन्य कोणत्याही मंडळाकडे किंवा राज्य शासनाकडे करावयाचे हस्तांतरण आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती;

(ङ) ज्या कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये मंडळ एक पक्षकार आहे त्या कार्यवाहीतील पक्षकार म्हणून मंडळाच्या जागी असा हस्तांतरिती ठेवणे किंवा मंडळाच्या जोडीला आणखी असा कोणताही हस्तांतरिती सामील करणे आणि मंडळापुढे प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही अशा कोणत्याही हस्तांतरितीकडे वर्ग करणे;

(च) मंडळाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची अशा कोणत्याही हस्तांतरितीकडे किंवा हस्तांतरितीकडून बदली किंवा पुनःसेवायोजन आणि 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७)-कलम १११ च्या उपबंधांच्या अधीनतेने, अशा बदलीनंतर किंवा पुनःसेवायोजनानंतर अशा कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती;

(छ) मान्यताप्राप्त योजना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा आनुषंगिक, परिणामरूप आणि पूरक बाबी.

(४) जेव्हा, कोणत्याही मंडळाची मत्ता, अधिकार व दायित्वे यांचे हस्तांतरण करणारा आदेश या कलमाखाली काढला जातो तेव्हा, त्या आदेशाच्या आधारे, मंडळाची अशी मत्ता, अधिकार व दायित्वे हस्तांतरितीमध्ये निहित होतील आणि ती मत्ता, अधिकार व दायित्वे हस्तांतरितीची होतील.

(५) या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येईल आणि हा अधिनियम व त्याखाली काढलेल्या अधिसूचना, या आदेशाच्या उपबंधांच्या अधीनतेने अंमलात येतील.

(६) या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

**राज्याच्या एका भागासाठी मंडळ स्थापन करण्याबाबत विशेष उपबंध.**

**६६ख.** (१) जर 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) याद्वारे प्रादेशिक बदल घडवून आणल्यामुळे, १ नोव्हेंबर, १९५६ रोजी आणि तेव्हापासून हा अधिनियम राज्याच्या एखाद्या भागाला किंवा काही भागांनाच लागू झाला असेल, पण त्याच्या उरलेल्या भागात तो अंमलात आणलेला नसेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या राज्याच्या शासनाने ज्या भागात किंवा भागांमध्ये हा अधिनियम अंमलात आहे अशा भागासाठी किंवा भागांसाठी एक मंडळ किंवा त्याहून अधिक मंडळे स्थापन करणे कायदेशीर होईल आणि अशा बाबतीत मंडळाच्या संबंधातील अधिनियमातील "राज्य" याच्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, राज्याच्या ज्या भागासाठी मंडळ स्थापन केले आहे त्या भागाचा उल्लेख म्हणून लावला जाईल.

(२) जेव्हा असे कोणतेही मंडळ स्थापन करण्यात येईल आणि संपूर्ण राज्यासाठी मंडळ स्थापन केले पाहिजे असे राज्य शासनाला वाटत असेल तेव्हा, राज्य शासनाला **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे, राज्याच्या एका भागासाठी स्थापन केलेले मंडळ विसर्जित करता येईल किंवा अशा मंडळाची पुनर्घटना आणि पुनर्रचना करता येईल किंवा संपूर्ण राज्यासाठी नवीन मंडळ स्थापन करता येईल आणि त्यानंतर, मंडळाची राज्याच्या त्या भागाच्या संबंधातील मत्ता, अधिकार व दायित्वे पुनर्घटित मंडळामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, नवीन मंडळामध्ये निहित होतील, आणि ती मत्ता, अधिकार व दायित्वे, पुनर्घटित मंडळाची किंवा, प्रकरणपरत्वे, नवीन मंडळाची होतील.]

**इस्लाम धर्म प्रतिज्ञापित न करणाऱ्या व्यक्तींनी विवक्षित वक्फांच्या परिपोषणासाठी दिलेल्या किंवा देणगी म्हणून दिलेल्या संपत्तीला अधिनियम लागू करणे.**

[1][ ६६ग. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा इस्लाम धर्म प्रतिज्ञापित न करणाऱ्या एखाद्या व्यक्तीने—

(क) मशीद, ईदगाह, इमामवाडा, दर्गा, खानगाह किंवा मकबरा;

(ख) मुस्लिम कबरस्थान;

(ग) सराई किंवा मुसाफरखाना,

यांच्या रूपातील वक्फाच्या परिपोषणासाठी एखादी जंगम किंवा स्थावर संपत्ती दिली असेल किंवा देणगी म्हणून दिली असेल तर अशी संपत्ती त्या वक्फामध्ये अंतर्भूत असल्याचे मानण्यात येईल व ती संपत्ती ज्या वक्फामध्ये याप्रमाणे अंतर्भूत आहे त्या वक्फाच्याच पद्धतीने त्या संपत्तीबाबत कार्यवाही केली जाईल. ]

**नियम करण्याची शक्ती.**

६७. (१) राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [2][या अधिनियमाचे प्रकरण २ रे-क यामधील प्रयोजनांहून अन्य अशी प्रयोजने] पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषत:, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) कलम ५ च्या पोटकलम (२) खाली प्रकाशित केलेल्या वक्फ-सूचीमध्ये समाविष्ट असेल असा तपशील;

(ख) मंडळाला ज्यांच्या अधीनतेने कोणतीही संपत्ती हस्तांतरित करता येईल अशा शर्ती आणि निर्बंध;

(ग) मंडळाच्या कार्याधिकारांचे विनियमन

(घ) मंडळाच्या सचिवाच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(ङ) या अधिनियमाखाली कोणतीही चौकशी कशा रीतीने करता येईल;

(च) या अधिनियमाखाली चौकशी करीत असताना मंडळ किंवा आयुक्त किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांना वापरता येतील अशा, दिवाणी न्यायालयामध्ये निहित केलेल्या शक्ती;

(छ) ज्या नमुन्यात वक्फ नोंदवही ठेवली जाईल तो नमुना आणि त्यात समाविष्ट असेल असा आणखी तपशील;

(ज) मंडळाला कोणत्या नमुन्यात आणि किती मुदतीत आपला अर्थसंकल्प तयार करून तो सादर करता येईल [3]* * *;

(झ) ज्या पद्धतीने वक्फ निधीचे हिशेब ठेवले जातील आणि लेखापरीक्षा करण्यात येईल ती पद्धती आणि लेखापरीक्षकाच्या अहवालातील मजकूर;

(ञ) वक्फ निधीत पैशांचा भरणा, अशा पैशांची गुंतवणूक, अभिरक्षा आणि संवितरण;

(ट) कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या अटींवर व शर्तींवर मंडळाला कर्ज घेता येईल;

(ठ) वक्फाच्या संबंधात देय असलेले अंशदान मंडळाला कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने कमी करता येईल किंवा माफ करता येईल;

(ड) या अधिनियमाखाली येणे असलेली कोणतीही रक्कम जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करताना अनुसरावयाची प्रक्रिया;

(ढ) जी विहित करावयाची आहे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**विनियम करण्याची शक्ती.**

६८. (१) मंडळाला, या अधिनियमाखालील त्याची कार्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने, या अधिनियमाशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषत:, आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांत पुढीलपैकी सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा :—

(क) मंडळाच्या सभांची वेळ व ठिकाण आणि त्या सभांमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या;

(ख) मंडळाच्या सभांमधील कामकाजाची प्रक्रिया व संचालन;

(ग) मंडळाच्या समित्यांची घटना व कार्ये आणि अशा समित्यांच्या सभांतील कामकाज चालवण्याबाबतची प्रक्रिया;

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४–कलम २१ द्वारे घातले.

२. कित्ता–कलम २२ द्वारे "या अधिनियमाची प्रयोजने" या मजकुराऐवजी घातले.

३. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४–कलम २२ द्वारे विवक्षित शब्द गाळण्यात आले.

(घ) मंडळाच्या अध्यक्षाला किंवा सदस्यांना अथवा समितीच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते किंवा फी;

(ङ) मंडळाचे अधिकारी व सेवक यांच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(च) वक्फ-नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्यात अंतर्भूत असावयाचा अधिक तपशील आणि वक्फ नोंदणीची पद्धती व ठिकाण;

(छ) वक्फ नोंदवहीत अंतर्भूत असावयाचा अधिक तपशील;

(ज) मंडळाच्या कार्यालयात ठेवावयाची पुस्तके;

(झ) कोणत्या नमुन्यात आणि कोणत्या मुदतीत वक्फाचे अर्थसंकल्प मुतवल्लीला तयार करून सादर करावे लागतील आणि मंडळाला ते संमत करावे लागतील;

(ञ) ज्या पद्धतीने वक्फाचे हिशेब ठेवण्यात येतील व त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल ती पद्धती आणि लेखापरीक्षकाच्या अहवालातील मजकूर;

(ट) या अधिनियमाखालील अंशदाने वसूल करण्याच्या प्रयोजनांसाठी वक्फाचे उत्पन्न संगणित करण्याची पद्धती;

(ठ) मंडळाच्या कार्यवृत्तांचे आणि अभिलेखांचे निरीक्षण करण्यासाठी किंवा त्यांच्या नकला देण्यासाठी द्यावी लागणारी फी;

(ड) ज्या व्यक्तींकडून मंडळाचा आदेश किंवा निर्णय अधिप्रमाणित केला जाईल अशा व्यक्ती;

(ढ) जी विहित करावयाची आहे किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेले सर्व विनियम, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येतील आणि अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून ते विनियम अंमलात येतील.

**निरसन आणि व्यावृत्ती.**

६९. (१) पुढील अधिनियमिती म्हणजे--

(१) 'बंगाल धर्मादाय दाननिधी, सार्वजनिक इमारती आणि राजगामिता विनियम, १८१०' (१८१० चा बंगाल विनियम १९ वा);

(२) 'धार्मिक दाननिधी अधिनियम, १८६३' (१८६३ चा २०) * * *[१];

(३) 'धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९०' (१८९० चा ६);

(४) 'धर्मादाय व धार्मिक न्यास अधिनियम, १९२०' (१९२० चा १४);

(५) 'मुसलमान वक्फ अधिनियम, १९२३' (१९२३ चा ४२);

हे ज्या कोणत्याही वक्फाला हा अधिनियम लागू होतो त्याला लागू होणार नाहीत.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जर कोणत्याही राज्यात, या अधिनियमाशी समनुरूप असा [पोटकलम (१) मध्ये उल्लेखलेल्या अधिनियमिती व्यतिरिक्त] कोणताही कायदा तेथे अंमलात असेल तर, तो समनुरूप कायदा निरसित ठरेल :

परंतु, अशा निरसनामुळे समनुरूप कायद्याच्या पूर्वप्रवर्तनावर परिणाम होणार नाही, आणि त्याच्या अधीनतेने, समनुरूप कायद्याद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करताना केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ती केली गेली त्या दिवशी जणू काही हा अधिनियम अंमलात असावा त्याप्रमाणे या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या शक्ती वापरून करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**अडचणींचे निवारण.**

[२][७०. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना एखादी अडचण उद्भवल्यास, केंद्र शासनाला ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे, या अधिनियमाशी विसंगत नसलेले उपबंध **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे करता येतील.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ३४-कलम २३ द्वारे "याचे कलम ५" हा मजकूर गाळला.

२. किता--कलम २४ द्वारे घातले.

## अनुसूची

[ कलम ९(१क) पहा. ]

### विशोधनांची सूची

१. कलम ५ च्या पोटकलम (२) मध्ये "वक्फ सूची" या शब्दाऐवजी "सुनी वक्फांची किंवा, प्रकरणपरत्वे, शिया वक्फांची सूची" हे शब्द घातले जातील.

२. कलम ११ मध्ये,—

(क्) खंड (ख्) ऐवजी पुढील खंड घालण्यात येईल, तो असा :—

"(ख्) मुस्लिम कायद्याचे ज्ञान असलेल्या आणि सुनी वक्फ मंडळाच्या बाबतीत, 'राज्य जमियत उल-उलमा-इ-हिंद' यासारख्या संघटनांचे आणि शिया वक्फ मंडळाच्या बाबतीत राज्य शिया परिषद यासारख्या संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती (मग अशा व्यक्ती हनाफी असोत वा अहले हादीस असोत, वा शफी असोत);";

(ख्) दुसरे परंतुक गाळण्यात येईल.

३. कलम १५ चे पोटकलम (२)-खंड (च्) मधील स्पष्टीकरण वगळण्यात येईल.

४. कलम २७ ऐवजी पुढील कलम घालण्यात येईल, ते असे :—

"एखादी संपत्ती ही वक्फ-संपत्ती आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय.

२७. (१) मंडळाला जी कोणतीही संपत्ती ही वक्फाची संपत्ती आहे असे समजण्यास कारण असेल त्या संपत्तीच्या संबंधात त्याला स्वतःला माहिती गोळा करता येईल आणि विशिष्ट संपत्ती ही वक्फ-संपत्ती आहे किंवा नाही याबाबत प्रश्न उद्भवल्यास किंवा एखादा वक्फ हा सुनी वक्फ आहे की शिया वक्फ आहे याबाबत प्रश्न उद्भवल्यास, मंडळ तो प्रश्न सक्षम अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयाकडे निर्देशित करील.

(२) पोटकलम (१) खाली निर्देशित केलेल्या कोणत्याही प्रश्नावरील दिवाणी न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.".]

# THE WAKF ACT, 1954

## वक्फ अधिनियम, १९५४

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| additional commissioner | अतिरिक्त आयुक्त | [S. 3(*d*)] |
| Ahle-Hadis | अहले हादीस | [S. 11(*b*)] |
| amin | अमीन | [S. 3(*f*)] |
| assistant commissioner | सहायक आयुक्त | [S. 3(*d*)] |
| benefaction | धर्मदान | [S. 8B(*2*)] |
| beneficiary | हिताधिकारी | [S. 3(*a*)] |
| benefit | लाभ | [S. 3(*b*)] |
| Board | मंडळ | [S. 3(*c*)] |
| casual vacancy | निमित्तवशात् रिकामे होणारे पद | [S. 8D(*2*)(*a*)] |
| category | वर्ग | [S. 11] |
| Central Wakf Fund | मध्यवर्ती वक्फ निधि | [S. 8B(*2*)] |
| cess | उपकर | [S. 3(*g*)(*i*)] |
| charitable | धर्मादाय | [S. 3(*a*)] |
| Commissioner | आयुक्त | [S. 3(*d*)] |
| common seal | सामाईक मोहर | [S. 9(*2*)] |
| composition | रचना | [S. 10-m.n.] |
| constitution | घटना | [S. 8A-m.n.] |
| corpus of the wakf | वक्फाचे मूलधन | [S. 3(*g*)(*ii*)] |
| council | परिषद | [S. 3(*dd*)] |
| dedication | समर्पण | [S. 3(*1*) last para.] |
| disqualification | निरर्हता | [S. 13-m.n.] |
| donation | देणगी | [S. 3(*g*)(*ii*)] |
| Durgah Khawaja Saheb, Ajmer | दर्गा ख्वाजा साहेब, अजमेर | [S. 2-proviso] |
| entertain | विचारार्थ स्वीकारणे | [S. 6(*1*)-proviso] |
| gross annual income | ठोक वार्षिक उत्पन्न | [S. 3(*g*)-proviso] |
| Hanafi | हनाफी | [S. 11(*b*)] |
| incoming | नव्याने आलेला | [S. 29(*1*)] |
| incorporation | निगमन | [S. 9-m.n.] |
| interval | कालांतर | [S. 33(*1*)] |
| issue a commission | आयोगपत्र काढणे | [S. 4(*4*)(*d*)] |
| Jamiat-ul-Ulama-i-Hind | जमियत–उल–उलमा–इ–हिंद | [S. 11(*b*)] |
| Khadim | खादिम | [S. 3(*f*)] |
| land revenue | जमीन-महसूल | [S. 3(*g*) (*i*)] |
| last known | ज्ञात असा लगतपूर्वीचा | [S. 36B(3)(*b*)] |
| mashrut-ul-khidmat | मश्रुत-उल-खिदमत | [S. 3(*l*)(*ii*)] |
| material benefit | महत्त्वाचा लाभ | [S. 46(*3*)] |
| meeting | सभा | [S. 14-m.n.] |
| member | सदस्य | [S. 3(*e*)] |
| mismangement | गैरव्यवस्थापन | [S. 13(*e*)] |
| moral turpitude | नैतिक अध:पतन | [S. 13(*d*)] |
| mujawar | मुजावर | [S. 3(*f*)] |
| mutawalli | मुतवल्ली | [S. 3(*b*)] |

| | | |
|---|---|---|
| naib-mutawalli | नायब-मुतवल्ली | [S. 3(*f*)] |
| net annual income | निव्वळ वार्षिक उत्पन्न | [S. 3(*g*)] |
| offering | उपहार | [S. 2(*g*)(*ii*)] |
| of public utility | लोकोपयोगी | [S. 2(*a*)] |
| origin | उत्पत्ति | [S. 15(*2*)(*a*)] |
| perpetual succession | उत्तराधिकाराची निरंतर परंपरा | [S. 9(*2*)] |
| person interested in wakf | वक्फामध्ये हितसंबंधित असलेली व्यक्ती | [S. 3(*h*)] |
| pious | पवित्र | [S. 3(*a*)] |
| prescribed | विहित | [S. 3(*i*)] |
| professing | प्रतिज्ञापित करणारा | [S. 3(*l*)] |
| rate | पट्टी | [S. 3(*g*)(*i*)] |
| religious | धार्मिक | [S. 3(*a*)] |
| religious rite | धार्मिक कृत्य | [S. 3(*h*)(*i*)] |
| report *n.* | अहवाल | [S. 33(*2*)] |
| *vb.* | अहवालात नमूद करणे | [S. 33(*2*)] |
| return | प्रतिवेदन | [S. 36(*b*)] |
| sajjadanishin | सज्जादनशीन | [S. 3(*f*)] |
| second or casting vote | दुसरा किंवा निर्णायक मताधिकार | [S. 14(*3*)] |
| service of a demand | मागणीपत्राची बजावणी | [S. 53(*1*)] |
| settle a scheme | योजना नक्की करणे | [S. 15(*2*)(*b*)] |
| Shefai | शफी | [S. 11(*b*)] |
| Shia wakf | शिया वक्फ | [S. 3(*j*)] |
| statement of accounts | हिशेब विवरणपत्र | [S. 32(*2*)] |
| State Shia Conference | राज्य शिया परिषद | [S. 11(*b*)] |
| States Reorganisation Act, 1956 | राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ | [S. 1(*3*)-2nd proviso] |
| successor | उत्तराधिकारी | [S. 17-proviso] |
| Sunni wakf | सुन्नी वक्फ | [S. 3(*k*)] |
| supersede | निष्प्रभावी करणे | [S. 64-m.n.] |
| supersession | निष्प्रभावन | [S. 64(*3*)(*a*)] |
| surplus income | अतिरिक्त उत्पन्न | [S. 15(*2*)(*e*)(*i*)] |
| survey | सर्वेक्षण | [S. 4(*1*)] |
| tax | कर | [S. 3(*g*)(*i*)] |
| erritorial changes | क्षेत्रीय बदल | [S. 1(*3*)-2nd proviso] |
| transaction of business | कामकाज चालवणे | [S. 14(*1*)] |
| under an obligation | आबंधनाधीन | [S. 61(*1*)] |
| undischarged | अविमुक्त | [S. 13(*c*)] |
| wakf | वक्फ | [S. 3(*l*)] |
| wakf-alal-aulad | वक्फ–अलाल–औलाद | [S. 3(*l*)(*iii*)] |
| wakf deed | वक्फनामा | [S. 3(*m*)] |
| wakif | वाकीफ | [S. 3(*h*)(*ii*)] |
| worship | उपासना | [S. 3(*h*)(*i*)] |
| writing under one's hand | स्वहस्ताक्षरित लेख | [S. 17] |

# वक्फ अधिनियम, १९५४

# THE WAKF ACT, 1954

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त आयुक्त | additional commissioner | [ S. 3(*d*) ] |
| अतिरिक्त उत्पन्न | surplus income | [ S. 15(*2*)(*e*)(*i*) ] |
| अमीन | amin | [ S. 3(*f*) ] |
| अविमुक्त | undischarged | [ S. 13(*c*) ] |
| अहले हादीस | Ahle-Hadis | [ S. 11(*b*) ] |
| अहवाल | report | [ S. 33(*2*) ] |
| अहवालात नमूद करणे | report | [ S. 33(*2*) ] |
| आबंधनाधीन | under an obligation | [ S. 61(*1*) ] |
| आयुक्त | Commissioner | [ S. 3(*d*) ] |
| आयोगपत्र काढणे | issue a commission | [ S. 4(*4*) (*b*) ] |
| उत्तराधिकाराची निरंतर परंपरा | perpetual succession | [ S. 9(*2*) ] |
| उत्तराधिकारी | successor | [ S. 17-proviso ] |
| उत्पत्ति | origin | [ S. 15(*2*) (*a*) ] |
| उपकर | cess | [ S. 3(*g*)(*i*) ] |
| उपहार | offering | [ S. 2(*g*)(*ii*) ] |
| उपासना | worship | [ S. 3(*h*)(*i*) ] |
| कर | tax | [ S. 3(*g*)(*i*) ] |
| कामकाज चालवणे | transaction of business | [ S. 14(*1*) ] |
| कालांतर | interval | [ S. 33(*1*) ] |
| खादिम | khadim | [ S. 3(*f*) ] |
| गैरव्यवस्थापन | mismanagement | [ S. 13(*e*) ] |
| घटना | constitution | [ S. 8A-m.n. ] |
| जमियत--उल--उलमा--इ--हिंद | Jamiat-ul-Ulama-i-Hind | [ S. 11(*b*) ] |
| जमीन-महसूल | land revenue | [ S. 3(*g*)(*i*) ] |
| ठोक वार्षिक उत्पन्न | gross annual income | [ S. 3(*g*)-proviso ] |
| दर्गा ख्वाजा साहेब, अजमेर | Durgah Khawaja Saheb, Ajmer | [ S. 2-proviso ] |
| दुसरा किंवा निर्णायक मताधिकार | second or casting vote | [ S. 14(*3*) ] |
| देणगी | donation | [ S. 3(*g*)(*ii*) ] |
| धर्मदान | benefaction | [ S. 8B(*2*) ] |
| धर्मादाय | charitable | [ S. 3(*a*) ] |
| धार्मिक | religious | [ S. 3(*a*) ] |
| धार्मिक कृत्य | religious rite | [ S. 3(*h*)(*i*) ] |
| नव्याने आलेला | incoming | [ S. 29(*1*) ] |
| नायब मुतवल्ली | naib-mutawalli | [ S. 3(*f*) ] |
| निगमन | incorporation | [ S. 9-m.n. ] |
| निमित्तवशात् रिकामे होणारे पद | casual vacancy | [ S. 8D(*2*)(*a*) ] |
| निरर्हता | disqualification | [ S. 13-m.n. ] |
| निव्वळ वार्षिक उत्पन्न | net annual income | [ S. 3(*g*) ] |
| निष्प्रभावन | supersession | [ S. 64(*3*)(*a*) ] |
| निष्प्रभावी करणे | supersede | [ S. 64-m.n. ] |
| नैतिक अधःपतन | moral turpitude | [ S. 13(*d*) ] |
| पट्टी | rate | [ S. 3(*g*)(*i*) ] |
| परिषद | council | [ S. 3(*dd*) ] |

मराठी–इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| पवित्र | pious | [ S. 3(*a*) ] |
| प्रतिवेदन | return | [ S. 36(*d*) ] |
| प्रतिज्ञापित करणारा | professing | [ S. 3(*l*) ] |
| मंडळ | Board | [ S. 3(*c*) ] |
| मध्यवर्ती वक्फ निधि | Central Wakf Fund | [ S. 8B(*2*) ] |
| मश्रुत-उल-खिदमत | mashrut-ul-khidmat | [ S. 3(*l*)(*ii*) ] |
| महत्वाचा लाभ | material benefit | [ S. 46(*3*) ] |
| मागणीपत्र बजावणे | service of a demand | [ S. 33(*1*) ] |
| मुजाबर | mujawar | [ S. 3(*f*) ] |
| मुतवल्ली | mutawalli | [ S. 3(*b*) ] |
| योजना नक्की करणे | settle a scheme | [ S. 15(*2*)(*d*) ] |
| रचना | composition | [ S. 10-m.n. ] |
| राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ | States Re-organisation Act, 1956 | [ S. 1(*3*)-2nd proviso] |
| राज्य शिया परिषद | State Shia Conference | [ S. 11(*b*) ] |
| लाभ | benefit | [ S. 3(*b*) ] |
| लोकोपयोगी | of public utility | [ S. 3(*a*) ] |
| वक्फ | wakf | [ S. 3(*l*) ] |
| वक्फ-अलाल-औलाद | wakf-alal-aulad | [ S. 3(*l*)(*iii*) ] |
| वक्फनामा | wakf deed | [ S. 3(*m*) ] |
| वक्फाचे मूलधन | corpus of the wakf | [ S. 3(*g*)(*ii*) ] |
| वक्फामध्ये हितसंबंधित असलेली व्यक्ती | person interested in wakf | [ S. 3(*h*) ] |
| वर्ग | category | [ S. 11 ] |
| वाकीफ | wakif | [ S. 3(*h*)(*ii*) ] |
| विचारार्थ स्वीकारणे | entertain | [ S. 6(*1*)-proviso ] |
| विहित | prescribed | [ S. 3(*i*) ] |
| शफी | Shefai | [ S. 11(*b*) ] |
| शिया वक्फ | Shia wakf | [ S. 3(*j*) ] |
| सज्जादनशीन | sajjadanishin | [ S. 3(*f*) ] |
| सदस्य | member | [ S. 3(*e*) ] |
| सभा | meeting | [ S. 14-m.n. ] |
| समर्पण | dedication | [ S. 3(*l*)-last para.] |
| सर्वेक्षण | survey | [ S. 4(*1*) ] |
| सहायक आयुक्त | assistant commissioner | [ S. 3(*d*) ] |
| सामाईक मोहोर | common seal | [ S. 9(*2*) ] |
| सुनी वक्फ | Sunni wakf | [ S. 3(*k*) ] |
| स्वहस्ताक्षरित लेख | writing under one's hand | [ S. 17 ] |
| हनाफी | Hanafi | [ S. 11(*b*) ] |
| हिताधिकारी | beneficiary | [ S. 3(*a*) ] |
| हिशेब-विवरणपत्र | statement of accounts | [ S. 32(*2*) ] |
| क्षेत्रीय बदल | territorial changes | [S. 1(*3*)-2nd proviso] |
| ज्ञात असा लगतपूर्वीचा | last known | [ S. 36B(*3*)(*b*) ] |

# परिशिष्ट

## वक्फ अधिनियम, १९५४—महाराष्ट्र विशोधन अधिनियम

## वक्फ (महाराष्ट्र दुरुस्ती) अधिनियम, १९६५

(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३)

महाराष्ट्र राज्यास लागू असलेला 'वक्फ अधिनियम, १९५४' यात दुरुस्ती करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यास लागू असलेला 'वक्फ अधिनियम, १९५४' यात, यापुढे दिलेल्या कारणांसाठी दुरुस्ती करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास 'वक्फ (महाराष्ट्र दुरुस्ती) अधिनियम, १९६५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. महाराष्ट्र राज्यास लागू असलेला 'वक्फ अधिनियम, १९५४' (१९५४ चा २९) (ज्याचा यात यापुढे 'मुख्य अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम १० मध्ये पोट-कलम (२) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :— १९५४ चा अधिनियम २९ याच्या कलम १० ची दुरुस्ती.

"(२) मंडळाचा एक सभापती असेल व राज्य शासनाकडून तो कलम ११ अन्वये नेमण्यात आलेल्या सदस्यांमधून नामनिर्दिष्ट करण्यात येईल.".

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये,— १९५४ चा अधिनियम २९ याच्या कलम ६३ ची दुरुस्ती.

(क्) "राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख्) **(ही दुरुस्ती करण्याची आता आवश्यकता नाही.)**

(ग्) समासटीपेत, "राज्य शासनाकडून" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"राज्य शासनाकडून किंवा अधिकाऱ्याकडून."

४. मुख्य अधिनियमाचे कलम ६७, पोट-कलम (२) खंड (ज्), मध्ये "सादर करता येईल" या मजकुरानंतर, "आणि राज्य शासनास मान्य करता येईल" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल. १९५४ चा अधिनियम २९ याच्या कलम ६७ची दुरुस्ती.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुबई